१४

साहेब

यशवंतरावजी चव्हाण



लेखक

रंगनाथ कुलकर्णी

54
IL
Y.C.P
M923.254/CHA/KUL
008460
LIBRARY

पुरुषोत्तम प्रकाशन आणि वितरण

सुसंस्कार माला : पुस्तक ३ रे

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
8460

साहेब

(यशवंतरावजी चव्हाण)

संकलन आणि सादरकर्ते
रंगनाथ कुलकर्णी

M
923.254
CHA/KUL
Cop. 2

पुरुषोत्तम प्रकाशन आणि वितरण
सुसंस्कार माला : पुस्तक ३ रे

प्रकाशक :
पी. के. अण्णा पाटील
५/२, 'पूर्णा', वरळी,
मुंबई ४०० ०१८
फोन : ४९५ २०६०/४९३ १२०६

संपादक :
रंगनाथ कुलकर्णी
३५, चिरंतन, शिवसृष्टी,
कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४.
फोन : ५५२ १७५८

अक्षरजुळणी : सुमुख आर्टस्

छपाई :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
फोन : ४२२ ८२२२

मुखपृष्ठ :
संजय मिस्त्री
फोन : ५५२ ०१७९

प्रकाशन : २५ नोव्हेंबर १९९४
(यशवंतरावजींचा १० वा स्मृतिदिन)

किंमत : ४० रुपये

प्रस्तुतकर्त्याचे चार शब्द

१२ मार्च १९९१ रोजी कै. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जयंती निमित्त मुंबईला के. सी. कॉलेजमध्ये प्रतिष्ठानतर्फे ७००-८०० मान्यवर उपस्थितांसमोर 'साहेब' चा पहिला प्रयोग मी सादर केला.

त्यानंतर १९९१ च्या गणेशोत्सवात ३ प्रयोग केले. सोलापूरच्या 'शहीद स्मारक 'नाट्यगृहात, मालेगाव वाचनालयातर्फे, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, मुंबई इचलकरंजीच्या नाईट कॉलेजसाठी, पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या कामगार-कर्मचाऱ्यांसमोर, वसईला फादर मायकेल गोन्साल्विस यांच्या निमंत्रणावरुन ठिकठिकाणी 'साहेब' चे प्रयोग झाले.

प्रतिष्ठानतर्फे २५ नोव्हेंबर १९९१ ला कराड येथे स्मृतिसदनात आणि ८ जानेवारी १९९२ ला मुंबईच्या आलिशान केंद्रातही प्रयोग झाले.

राजकीय नेत्यांना निवडणुका, गट-वर्चस्ववादी राजकारणामुळे येणारे कार्यबाहुल्य आणि सामान्य जनात गंभीर-प्रकृती प्रबोधनशील कार्यक्रमांविषयाची उदासीनता वगैरेमुळे २ वर्षात २५ प्रयोग करीन ही माझी जिद्द पूर्ण होऊ शकली नाही.

मात्र, ''व्यक्तिगत राजकारणात कोण चढला, कोण पडला यापेक्षा देश पुढं गेला पाहिजे,'' ह्या थोरल्या साहेबाच्या धारणेवर लुब्ध होऊन मी, माझी पत्नी सौ. वसुमती आणि मुलगा नितीन यांच्या आग्रहावरुन हा प्रयोग उभा केला. या प्रयोगाने मला दोन वर्षे खूपच आनंद दिला, समाधान दिले.

प्राचार्य पी. बी. पाटील, कराडचे पी. डी. पाटील, दादासाहेब रुपवते, अण्णासाहेब शिंदे, सोलापूरचे दिकोंडा, नगरचे मधुकर कात्रे, मोहन धारिया प्रभृतींच्या प्रोत्साहनाने मला हे प्रयोग करता आले.

आता साहेबांच्या १० व्या स्मृतीदिनी प्रयोगाची संहिता पुस्तकरुपाने प्रसिध्द होत आहे, याचा मला आनंद आहे.

'एकपात्री'चे दालन अधिक समृध्द करण्याचे भाग्य 'साहेब'मुळे मला लाभले . . . बाकी 'पृथ्वी विशाल आहे आणि काळ अनंत आहे !' या भवभूतीच्या विख्यात उक्तीवर संपूर्ण श्रध्दा असलेला -

आपला नम्र,

रंगनाथ कुलकर्णी

२५ नोव्हेंबर १९९४

साहेब

(पार्श्वसंगीत . . . निवेदन . . . स्पॉटच्या केंद्रीकृत प्रकाशात सादरकर्ता)

महाबळेश्वरला,
एकाच ठिकाणी पाच नद्या उगम पावतात;
ह्या पाचही बहिणींचं,
एकमेकींवर अमर्याद प्रेम !
जन्मस्थानी वेगळं अस्तित्व,
पण ते तेवढ्यापुरतंच . . .
त्यांनी फुगडीचा फेर धरलाय असं वाटावं,
तोच
हातात हात घालून,
सुंदर गोफ विणून
त्या एकदिलानं गोमुखातून बाहेर पडतात.
ती शुभ्र धार कुंडात उडी घेते,
आणि पुन्हा जमिनीखालून वेगवेगळ्या वाटांनी
त्या निघून जातात . . .
शंभर मैलांच्या आत,
त्यांचा पुन्हा मिलाफ होतो.
आणि कराडपासून पुढं सगळ्याजणी कृष्णामय बनूनच,
सागराच्या भेटीला निघतात !
संगमावर आनंदाचा कल्लोळ उठतो !!
(वाद्यमेळांचा कल्लोळ, जलदगती सतारीचा तुकडा ऐकू येतो)
विभिन्नतेतच एकात्मता नांदते, ती अशी.

(संपूर्ण रंगमंच उजळतो)
त्यांचं पंचामृत मोठ्या पात्रात साठतं,

सुगंधित आणि चविष्ट बनून
पांथस्थांची तहान भागविण्यासाठी,
सगळ्यांना दिलासा - ओलावा देण्यासाठी
पूर्वमुखी होऊन वाहू लागतं :
जगाची संस्कृती आज जशी पूर्वमुखी होऊन
वाहू लागली आहे - तसंच !

देवराष्ट्र हे माझं जन्मगाव . . .
देवपण घेऊन जन्माला आलेलं -
सागरोबाच्या चारी बाजू आनंदबनानं भरलेल्या,
धर्म, अर्थ, काम, मोक्ष -
हे चारही पुरुषार्थ इथं सार्थपणे वावरतात !
सुपीक जमिनीत बी पेरलं,
म्हणजे चांगलं फोफावतं -
तशी इथली माणसं आणि त्यांची मनं . . .
या मातीचा गुण आणि मोल,
मी माझ्या तोंडानं काय सांगू ?
आमच्या भागातल्या मुली मागायच्या :
''कालं बेलं कासेगाव
ओण्ड मनू नांदगाव
साळ शिरंबं वाटेगाव
पाणी प्यायला येळगाव
आणि वस्तीला टाळगाव !''

इतर लक्षावधी गरीब घरातल्या मुलांप्रमाणेच
माझं लहानपण गेलं . . .

मी अवघा चार वर्षांचा होतो,
मामाच्या घरापाशी खेळत होतो -
समोरुन वडिल आले,
म्हणाले,
''बाळ, आपण घरी जाऊ या -
मला बरं नाहीए -''
काय होतंय, ते मला कळत नव्हतं . . .
आम्ही मुलं तुळशीच्या कट्टयावर
घोंगड्यावर बसलो होतो,
तोच आईच्या दु:खाचा हंबरडा कानावर आला :
''द्येवा रं द्येवा,
आसं कसं जालं रं पांडुरंगा ऽ ऽ''

(सतारीवर करुण सुरावट . . . प्रकाश मंद)
चौथ्या वर्षी पित्याचं छत्र गेलं,
पण आईचं प्रेम दुप्पट वाढलं.

मी इंग्रजी शाळेत जायला लागल्यावर,
माझा वर्गमित्र सखाराम म्हस्के -
मला नेहमी विचारायचा :
''तू किती शिकणार हायस् रं येशा ?''
''जितकं जास शिकता यील, तितकं शिकणार म्या -''
''मामलंदार व्हन्यायवडं ?''
''हो, तेवढं तर नक्कीच -''
''तू मामलेदार हो, इट्याला बदली करुन घे -
आपल्या या गावाला भेट देयाला ये . . .

पाटील बिटिल समदं जमलं का,
मला नावानं हाक मारुन जवळ बलीव !
म्हंजी, गावात माजी इज्जत वाहाडंल - कसं ?''
(किंचित् हसून)
पुढं मी मंत्री झालो,
मुख्यमंत्री झालो,
पण मामलेदार झालो नाही,
याची खंत बहुधा त्याच्या मनातून गेली नसावी !
(सौम्य हशा)

माझ्या आईचा एकच ध्यास होता,
एकच मंत्र होता :
''शिक्षण ही शक्ती आहे,
आणि ती आपण मिळवलीच पाहिजे !''

पहाटे जात्यावर ती ओवी म्हणायची :
''नका बाळांनो डगमगू -
चंद्रसूर्यावरील जाईल ढगू
नका बाळांनो डगमगू ।।''
७ वी पास झाल्यावर,
लोकसंगीताप्रमाणेच मला तमाशा पण आवडायला लागला !
एक दिवस संध्याकाळी,
आम्ही ५-६ मित्र निघालो तमाशा पहायला !
कृष्णा नदीची फरशी ओलांडून
एक मैल गेलो असू नसू -
तोच

समोरुन आमचे 'ड्रिल' मास्तर :
(दटावीत) 'फुर्र र्र र्र - काय रे ए पोरांनो !
कुठं चाललात एवढ्या सायंकाळी ?''
''स्टेशनावर ! तिथं टॉमशॉ येणार आहेत,
त्यांना पहायला -''
''हा कोण टॉम-शॉ ?''
''बर्नार्ड शॉचा मोठा भाऊ !'' *(मोठा हशा)*

ह्याच काळात मी केळुसकरांनी लिहिलेलं
''छत्रपती शिवाजी महाराजांचं चरित्र,''
शिवरामपंत परांजपे यांचे
''काळातले निबंध''
आणि पंढरनाथ पाटलांनी लिहिलेलं :
''महात्मा जोतीराव फुले यांचं चरित्र''
वाचून काढलं.
(गंभीर मुद्रेने) ते 'सायमन कमिशन'चे दिवस होते . . .
यतींद्रनाथ दासांचं आमरण उपोषण सुरु झालं तुरुंगात -
मी मनानं विलक्षण अस्वस्थ झालो :
लाहोरच्या तुरुंगात,
भर दुपारी प्रखर सूर्याला साक्षी ठेवून त्यांनी तेजस्वी आत्मार्पण केलं . . .
त्याच क्षणी मी निश्चय केला :
'कणा-कणानं आणि क्षणा-क्षणानं
ज्यांच्यासाठी देहत्याग करावा,
अशी ध्येयं आणि कामं - या देशात पुष्कळ आहेत !'
मला माझ्या आयुष्याचं सार समजलं,
सूर सापडला -
(तंबोरे झंकारतात)

आई मला नेहमी म्हणायची :
''आपण गरीब असलो, तरी आपली श्रीमंती
वागण्या-बोलण्यात आहे ! रीतीरिवाजात आहे !!
ती कायम ठेव -''
ह्या विचारानं, आम्हाला जीवनाचं तत्वज्ञान मिळालं -
माझी आई सुसंस्कृत होती.
म्हणायची : ''वेळ पडलीच तर,
आपण उपाशी रहावं -
पण, आल्या-गेल्याला पोटभर खाऊ घालावं !''
ती राम-कथा सांगायची -
हल्ली मी जितका जास्त विचार करतो,
तितकं वाटतं :
''त्या कथेचा प्राण सीता आहे
तिला 'रामायण' न म्हणता,
'सीतायन' म्हणावं - 'सीतायज्ञ' म्हणावं !''
गीतेचा अर्थ आईनं मला एका साध्या,
सोप्या, सरळ वाक्यात सांगितला :
''किसने द्येव अर्जुनाला सांगत्यात :
तू आपला मी-पना सोड -
आन् जे तू केलं पायजेलाएस,
त्ये तू करत ऱ्हा !''

आमची खरी शाळा आमची आई होती.
एकदा आमची आजी, आई आणि मी -
आम्ही तिघं मिळून पंढरपूरला जायला निघालो :
कराडपासून पंढरपूर ८० मैल
बैलगाडी छोटी - जेमतेम दोघं बसू शकतील एवढी !

म्हणून, एकानं पायी चालायचं -
आणि फक्त दोघांनी गाडीत बसायचं ठरलं.
आजी होती साठीच्या पुढं,
म्हटलं, "तू बस गाडीत !" तर -
"मला रे काय जालंया ?"
तिनं आपला चालायचा वाटा उचलला,
तिची प्रकृती काटक होती.
आठवड्याभरात आम्ही पंढरपूरला पोचलो -
तो 'ही' गर्दी, एवढी गर्दी त्यापूर्वी मी कधीच पाहिली नव्हती !
चार तास आम्ही दर्शनासाठी रांगेत उभे राहिलो.
गर्दीनं घामाघूम झालो होतो !
कुणी म्हणालं, "हा गरुडखांब -"
मी त्याला हात लावला, तर कुणीतरी ओरडलं :
"ए, हात लावू नकोस !
बाई, तुमच्या या पोराला सांभाळा -"
शेवटी, कसेबसे विठ्ठलाच्या मूर्तीपर्यंत पोचलो.
देवाच्या पायावर डोकं टेकवण्याएवढी काही माझी उंची नव्हती -
पुजारी आईवर खेकसला :
"चला, व्हा पुढं - "
तिकडं दुर्लक्ष करुन, आईनं मला उचलून
विठ्ठलाच्या पायावर घातलं !
पुढं नावलौकिक मिळाल्यावर,
सत्ताधारी झाल्यावर मी अनेकदा विठ्ठलाचं दर्शन घेतलं -
पण, लहान असताना,
आईनं त्याच्या पायावर जे घातलं,
त्याची अपूर्वाई अवर्णनीय होती !!
"ह्यात श्रध्देचा भाग किती ?" असं लोक विचारतात.
त्यांना मी नेहमी सांगत असे :

''कुठल्याही एका दगडाच्या मूर्तीत देव आहे,
असं मी मानीत नाही.
पण, ज्या ठिकाणी समाजपुरुष नतमस्तक होत आला आहे,
तिथं नतमस्तक होणं श्रेयस्कर आहे,
असं मी मानतो !
त्यानं माझ्या मनाला एक प्रकारचं आंतरिक समाधान मिळतं !''

नाटकाची गोडी तशी मला लहानपणापासूनच होती.
'माईसाहेब' नाटकात तर मी कामसुध्दा केलंय्
किर्लोस्करवाडीला . . .
औंधकरांचं 'बेबंदशाही' पाह्यलं;
'प्रेमसंन्यास'मधलं केशवराव दात्यांचं काम पहायला,
थेट कोल्हापूरला जाऊन आलो !
तिथं रहायची सोय नव्हती, म्हणून अपरात्रीच परत निघालो -
स्टेशन शांत, हवेत थंडी . . . आडोसा फक्त भिंतीचा !
''ए पोरांनो ! गाडी नसताना तुम्ही इथं ठेसनात काय करताय रं ?''
पोलिस खेकसला.
''नाटक बघायला आलो व्हतो -''
''फकस्त नाटक पघाया ?''
''हो ! आणि पहिल्या गाडीनं परत जाणार कराडला -''
''मंग खुशाल झोपा बाकड्यावर !''
पोलिसातसुध्दा कधीकधी चांगली माणसं भेटतात *(हशा)*

१९२९ साल.
डिसेंबर ३१ . . . शेवटची रात्र.
रावी नदीच्या तीरावर, पंडितजींनी संपूर्ण स्वातंत्र्याचा

पहिला उद्‌घोष केला !
२६ जानेवारी हा पहिला 'स्वातंत्र्य-दिन' साजरा करायचा,
असं ठरलं.
ते 'प्रतिज्ञा-पत्र' वाचायचं काम माझ्याकडे आलं.
कृष्णाकाठची ती सुंदर सकाळ,
मी कधीही विसरु शकणार नाही !!
खऱ्या अर्थानं माझं राजकीय जीवन सुरु झालं -
(पडद्यामागून गाणं ऐकू येतं)
शान न इसकी जाने पाए
चाहे जान भलेही जाए
विश्व विजय करके दिखलाए
तब होवे प्रण पूर्ण हमारा
झण्डा उँचा रहे हमारा ।।धृ।।

एकदा टिळक हायस्कूलच्या शेणोलीकर गुरुजींनी
वर्गात प्रत्येकाला एकेक चिठ्ठी दिली; म्हणाले,
''तुला मोठेपणी काय व्हायचंय, ते या चिठ्ठीवर लिही !''
मी लिहिलं :
''मी यशवंतराव चव्हाण होणार !''
मास्तर म्हणाले, ''तू चांगलाच अहंकारी दिसतोस -''
(फक्त खांदे उडविण्याची कृती)
पाठक हेडमास्तरांनी मला या प्रकाराबद्दल विचारलं;
मी सगळं खरं खरं सांगितलं -
तर, ते म्हणाले :
''यात गैर काय आहे ? शेणोलीकर काहीही म्हणाले असले,
तरी तू तिकडं लक्ष देऊ नकोस !''
त्यांच्या या बोलण्यानं मला मोठाच धीर आला,

आणि माझ्या नावामागची आजीनं सांगितलेली कथा
मला आठवली; आजी म्हणाली :
''तुज्या जल्माच्या येळी,
आक्काला लई तरास जाला - ती बेसुद जाली . . .
माज्या जिवाला घोर लागला *(सुस्कारा)*, खेड्यात कुटलं रं
दवापानी ? आखरीला सागरोबाला साकडं घातलं -
देवाला काकुळतीनं इनिवलं; म्हनलं :
''आक्काला जगिवन्यात येश दे
प्वाराचं नाव येशवंता ठिवीन !
सागरोबानं आय्कलं, म्हून तुजं नाव येशवंता ठिवलं !''
मग, मला माझ्या नावाचा सार्थ अभिमान का नसावा ?

वाईच्या प्राज्ञ पाठशालेचे तरुण विद्वान
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
यांची ८-१० भाषणं या काळात मी ऐकली.
त्यांनी आम्हाला स्वातंत्र्याचा अर्थ सांगितला :
''ही शेवटची लढाई आहे.
तीत आपण सर्वस्वाचा होम केला पाहिजे !''
(टाळ्यांचा कडकडाट)
काकासाहेब गाडगीळांची पण भाषणं मला आवडायची . . .
त्यात देशभक्ती, नर्मविनोद, खट्याळ उपरोध असायचा !
डावा खांदा उडवून बोलायची काकांची लकब होती.
तर्कतीर्थ आणखी एक भाषणात म्हणाले,
''तुम्ही बसला आहात तो घाट जसा गरम झाला आहे,
तशी तुमची बुध्दी आणि मनं झाली पाहिजेत . . .
देशाची तुमच्याकडे ही मागणी आहे !''

आता स्वातंत्र्याची चळवळ खेड्यापर्यंत पोचत होती.
आम्ही कार्यकर्ते यथाशक्ती, यथाबुध्दी श्रोत्यांना माहिती देत असू.
सभेत मी बऱ्यापैकी बोलत असे, असं लोक म्हणत !
''ग्रामीण विकास'' या विषयावर भाषण करुन
मी पुण्याच्या वक्तृत्व सभेत पहिलं बक्षीस मिळवलं होतं.
त्यावेळी वेगवेगळे विचार प्रचलित होते :
''रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?''
''तलवारीशिवाय स्वराज्य मिळणार कसं ?''
उत्तर होतं : जनतेचं आंदोलन उभारुन ! . . .
लोकांनी सहकार्याचा हात काढून घेतला,
की सरकार कोलमडू शकतं -
हाच गांधीजींच्या असहकाराचा मूलमंत्र होता !
(आवेशाने) तो प्रयोग जनतेनं सातारा जिल्ह्यात
बिळाशीला केला.
इंग्रजांनी ते बंड ठरवलं !
आणि अनन्वित अत्याचार केले -
पोलिसांनी घरा-घरात शिरुन लोकांना मारलं . . .
(किंकाळ्या, आरडाओरडा आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणा ऐकू येतात)
राघू अण्णा सेनानी आणि मी सैनिक !
आमचं दोन माणसांचं सैन्य -
ते सांगतील, तसं मी वागायचं !
त्यांनी देशपांडे वकिलांच्या दारावर टकटक केली.
''कोण आहे ?''
''आम्ही सातारहून आलोत -''
खुणेचा शब्द पटला !
''आत या -''
ठरल्याप्रमाणे अर्ध्या, अर्ध्या तासाच्या अंतरानं
निरनिराळ्या गावची माणसं येऊन आम्हाला भेटून गेली.

मनात म्हटलं *(खासगी आवाजात)* शिवाजी महाराजांच्याही काळात या डोंगराळ भागातले लोक असेच लढले असतील -''

(प्रकाश मंद होतो. बोलणे फक्त कुजबुजीच्या सुरात)

आम्ही गावकऱ्यांना आश्वासन देत होतो :

''बिळाशीचं नाव,

आता राज्यात सगळीकडे ठाऊक झालंय् -

लक्षात ठेवा :

तुम्ही काही एकटे नाहीत -

निर्भय व्हा !

मात्र, वातावरणात कुठंही ढिलाई येऊ देऊ नका . . .''

('वंदे मातरम्'च्या घोषणा)

डोंगर ओलांडून आम्ही बिळाशीत शिरलो,

तोच शीळ ऐकू आली *(दचकून)* म्हटलं,

''काय रे, पोलीस आले की काय ?''

बरोबरचा तरुण शांतपणे म्हणाला,

''ही पोलिसांची शीळ नाहीए-''

गावात एक म्हातारे गृहस्थ भेटले, म्हणाले,

(खासगीत) ''पोलिसांची सगळी व्यवस्था करुन आलोय मी !''

आम्ही पारावर बसलो,

झेण्डे काढले; लोक जमले,

त्यांनी जयघोष केला :

''भारतमाता की जय !''

''महात्मा गांधी की जय !!''

सभा संपल्यावर राघूअण्णांनी पुन्हा त्या म्हातारेबुवांना विचारलं :

''पोलिसपार्टी आलीय् म्हणता,

पण आम्हाला तर कुठं दिसत नाही ती ?''

(अंगठ्यानं पिण्याची कृती दाखवीत) ''सांगितलं ना - त्यांची सगळी व्यवस्था मी केलीय् !

चिक्कार दारु पिऊन पडलेत ते तिकडे !! *(हशा)*

आता मात्र, रात्रीच वारणा ओलांडून पलिकडे जा -

तोपर्यंत वाटेत कुठंही थांबू नका !''

त्या माहितगार मुलानं आम्हाला नदीच्या उतारापर्यंत पोचवलं,

आणि तो म्हणाला :

''पलिकडं कोल्हापूर संस्थानची हद्द आहे -

निरोप गेलेलाच आहे;

कुणीतरी तुमच्या मदतीला येईलच !''

गुडघाभर पाण्यातनं वाट काढली -

(पाण्यात धोतर वर करुन चालणे - लाटांचा आवाज)

पलिकडच्या गावात एकजण भेटला. म्हणाला,

''दमला असाल ! भाकरी खा आणि देवळात जाऊन झोपा -''

(रंगमंच पूर्ण प्रकाशानं उजळतो . . . नव्या उत्साही सुरात)

हे साहसी आणि रोमांचकारी नाट्य

माझ्या तरुण मनाला सुखवीत होतं !!!

तुरुंगात जायची शक्यता सध्या तरी हुकली होती -

मनाची उमेद वाढली होती . . .

(उल्हासदायी सुरावट)

''यशवंता, आता रे कुठं जायचं ?''

''कोकणात, रत्नागिरीला !''

''रत्नागिरीला जायला तू एवढा उत्सुक का रे बाबा ?''

''कारण,

मी अजून समुद्र पाहिलेला नाही;

आणि दुसरं असं की,

तिथं सावरकर रहातात !''

हा मुद्दा राघूअण्णांना पटला.

(उजव्या कोपऱ्यातून निळाशार प्रकाशझोत येतो)

मिऱ्या बंदराच्या बाजूला जाऊन

मी लख्खदिशी समुद्र पाहिला . . .

ओ हो हो ! केवढा त्याचा विस्तार !!!

(बासरीचे उत्साहदायी स्वर . . .)

कार्तिक महिन्यातल्या शांत सकाळी,

सागराचं ते रुप मला निळ्याभोर आकाशासारखं

प्रसन्न वाटलं !

मी पाहिलेला - तो पहिला समुद्र,

जन्मात कधीही विसरु शकणार नाही !

दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता

आम्ही सावरकरांच्या घरापाशी पोचलो.

जिना चढून वर गेलो -

. . . मध्यमशी खोली . . . चार खुर्च्या . . .

आम्ही बसलो.

आतून स्वातंत्र्यवीरांचा आवाज कानावर येत होता.

ते बाहेर आले, आम्ही उठून उभे राहिलो -

त्यांना नमस्कार केला :

मध्यम उंची, किरकोळ बांधा, डोळ्यांवर चष्मा -

त्या पलिकडून समोरच्याचा वेध घेणारी त्यांची ती भेदक नजर . . . अंगात स्वच्छ सदरा, सैलसं धोतर, पायात साध्या वहाणा अशा घरगुती वेषात ते होते.

(शांत सुरात) ''एवढा लांब प्रवास करुन का आलास बाळ ?''

राघूअण्णांनी त्यांना बिळाशच्या बंडाची हकीकत सांगितली, तेव्हा त्यांच्या तेजस्वी डोळ्यात मला किंचित हसू दिसलं -

म्हणाले, ''मोठेच पराक्रमी दिसता !'' *(मिस्किल हसतात)*

त्या हसण्यात कौतुकाचा भाग जास्त होता. थांबून म्हणाले,

''तुम्हाला काही विचारायचंय् का ?''

''मला फक्त आपल्याला डोळे भरुन पहायचं होतं,'' मी म्हणालो.

ते उठून माझ्याजवळ आले; म्हणाले,

''माझ्यात पहाण्यासारखं काय आहे ?

मी तुमच्यासारखाच माणूस आहे -

तुमच्या आधी काही वर्षं जन्मलो, एवढंच !

देशसेवेचं व्रत घेतलं, बलिदानाची प्रतिज्ञा करुन कामाला लागलो - आता तुमची पिढी काय करते,

ते बघायचं - बस्स !!''

तात्यांनी आम्हाला सदिच्छा दिल्या.

सागर आणि सावरकर मला एकाच वेळी रत्नागिरीत भेटले.

(पडद्यातून 'जयोऽऽस्तुते . . . . जे जे उत्तम, उदात्त, उन्नत' ह्या गाण्याच्या ओळी एकू येतात)

१९३० सालच्या चळवळीत जेलमध्ये जाणं.

म्हणजे आमरण स्वातंत्र्याचं व्रत स्वीकारणं होतं.

स्वातंत्र्य-संग्राम अधिकाधिक लोकाभिमुख

आणि शक्तिशाली होत होता,

तसतसे ब्रिटिश सत्ताधारी बेचैन होऊ लागले -

कराड नगरपालिकेनं,

गोऱ्या गव्हर्नरला मानपत्र द्यायचा बूट काढला !

तो आम्ही स्वातंत्र्य-सैनिकांनी बहिष्कार घालून उधळून लावला . . .

त्यावर्षी मी इंग्रजी ६ वी पास झालो.

माझी सर्वसामान्य बुध्दी आणि समज वाढली होती.

मला आठवतं :

(आनंददायी सुरावट मंदपणे एकू येऊ लागते.)
पोस्टमन रोज माझ्यासाठी वर्तमानपत्र घेऊन येई.
मी आमराईत जात असे -
ओळीनं उभ्या असलेल्या आंब्यांच्या झाडांच्या रांगा,
झाडांना लगडलेले आंबे,
त्यांचा हवा-हवासा वाटणारा सुगंध,
मोठं प्रसन्न वातावरण असे तिथं -
हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या,
'पण लक्षात कोण घेतो ?', 'मी', 'उष:काल';
केतकरांची 'ब्राह्मणकन्या' -
याच रम्य परिसरात मी वाचून काढल्या.
एकदा वाटलं,
की कालिदासाचं 'मेघदूत' आपण मुखोद्‌गत का करु नये ?
(तंबोऱ्याचा झंकार, संतूर आणि तबल्याचा तुकडा)
'आषाढस्य प्रथम दिनी त्या, दिसे पर्वतावरी
नयनरम्य घन करी कड्यावर, गज वा क्रीडांगण'

कराडला भरलेल्या जिल्हा राजकीय परिषदेत
माधवराव बागल यांनी उपसूचना म्हणून
आर्थिक मागण्या मांडल्या -
ते सगळे शेतकरी समाजाचे
जिव्हाळ्याचे प्रश्न होते, डॉक्टर-वकील अशा
पांढरपेशा शहरी पुढाऱ्यांना त्यांचं काय ?
त्या काळात 'लाऊड स्पीकर' नसूनही
माधवरावांनी शेतकऱ्यांचा बुलंद आवाज उठविला !
त्यांची उपसूचना टाळ्यांच्या गजरात मंजूर झाली.
माझं राजकीय शिक्षण;

जीवनाच्या शाळेत, हे असं चालू होतं :
गरिबांचे कैवारी कोण,
आणि विरोधक कोण -
हे लक्षात घेऊन स्वातंत्र्याची चळवळ
आपण चालवली पाहिजे,
असं मला वाटायचं !

पंडित मदन मोहन मालवीयजींच्या सभेला
भाऊसाहेब बटाणे आणि
नरसिंह चिंतामण केळकर -
असे दोन अध्यक्ष होते; म्हणून मी 'ज्ञानप्रकाश'ला बातमी पाठवली :
''तात्यासाहेब केळकरांना अर्धे अध्यक्षपद !'

गावातनं कुणीतरी माझा मित्र गौरीहर सिंहासने याच्या बनावट सहीनं 'ज्ञानप्रकाश'ला पत्र पाठवलं, की 'ही बातमी चुकीची आहे !'

त्यांनी ते छापलं -
आता काय करायचं ?
मी आणि गौरीहर पुण्याला गेलो,
काकासाहेब लिमयांना भेटलो - 'ज्ञानप्रकाश'चे संपादक -
ते म्हणाले :
(अनुनासिक) ''तुम्ही दुसरं पत्र द्या. आम्ही तेही छापू.''
त्यांनी आमचंही पत्र छापलं !
पण, या घटनेनं माझ्यातला 'किंचित बातमीदार' मात्र तिथेच संपला !

पुढं, अनेक थोर संपादकांशी माझे स्नेहाचे संबंध जुळले, त्याची 'गंगोत्री' हीच तर नसेल ?

'गोलमेज परिषदे'ला हजर राहून
गांधीजी परत आले . . .

देशात सत्याग्रह-संग्रामाचं वातावरण तयार झालं !
ब्रिटिशांची दडपशाही चालूच होती -
मी घरात सांगून टाकलं :
''यंदा काही मी मॅट्रिकला बसणार नाही !''
आणि कार्यकर्त्यांना म्हणालो,
''मी तुमच्याबरोबर आहे - जरुर तर आघाडीवरसुध्दा राहीन -''

गांधीजींना अटक झाली -
निषेधार्थ देशभर निदर्शनं झाली . . .
आम्ही मुला-मुलांनी झाडावर तिरंगी झेण्डा फडकावला !
('वंदे मातरम्'च्या घोषणा)
पोलिस-अधिकाऱ्यानं आम्हाला हेडमास्तरांच्या खोलीत जाब विचारला.
''हो ! मी केलंय् हे !!''
मी ठामपणे सांगितलं. मला अटक झाली . . .
सक्रिय राजकारणाची ती पहिली,
शास्त्रपूत अशी दीक्षा होती, दीक्षा !
तेव्हा माझं वय होतं १७ -
१८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली मला . . .
निरोप द्यायला आई आली होती,
मास्तरपण आले होते. म्हणाले,
''अरे माफी माग - सोडून देतील !''
तशी आई उसळून म्हणाली,
(खंबीरपणे) ''काय बोलता तुम्ही मास्तर ?
मापी मागायचं काई बी कारन नाय् -
द्येव आपल्या पाटीशी हुबा हाय रं येशवंता !''
आईचा हा मोठेपणा,
मला एक विलक्षण उदात्त वळण देऊन गेला . . .

'दहा बाय बारा'च्या कोठडीतली ती पहिली रात्र.
त्या गुदमरणाऱ्या वातावरणात आधी मला झोपच आली नाही;
सकाळी उठून पहातो, तो -
कुठल्यातरी संस्थानातला कैदी,
हातापायात बेड्या, अंगावर कैद्याचे कपडे -
मी त्याला विचारलं :
''बेड्या का रे घातल्या ?''
''मी तुरचीचा कृष्णा धनगर -''
त्याचं ते रुप पाहून माझ्या मनात विचार आला :
राम गणेश गडकरी यांच्या
'राजसंन्यास'
नाटकाच्या शेवटच्या प्रवेशातला संभाजीच दिसतो हा -
कोणत्याही क्षणी तो ते स्वगत म्हणू शकेल :
''. . . मरणाचा कुणाला अनुभव नाही म्हणून :
पण, माझी ही अवस्था म्हणजेच मरण असेल का ?
काही दिसत नाही, काही भासत नाही,
विखारलेलं मस्तक सुन्न झाल्यामुळं काही सुचत नाही,
आठवत नाही, कळत नाही -
जीव जड झाला आहे आणि
शरीर हलकं वारे मोल झालं आहे;
अरेरे, काय झालं हे ? . . .
मराठ्यांचा राजा,
मोऱ्यांचा कैदी झाला -
वाघाची गरीब गाय झाली !
मर्दाचा मातीमोल मुडदा झाला -
होत्याचं नव्हतं झालं,

आता काय व्हायचं राह्यलंय ?''

येरवडा जेलचा दरवाजा -
छे : ! दरवाजा नव्हताच तो;
वाघाचा जबडा वाटला,
वाघाचा जबडा -
माझ्या कोवळ्या मनाला !!

काटेरी कुंपणाचं हे भलमोठ्ठं वर्तुळ,
तंबूच्या बराकी . . .
सत्याग्रहींनी ओळीनं जाऊन जेवणाची थाळी, पाण्याचं भांडं
बिस्तरा काखोटीला मारला -
आणि आमची 'रपेट' आत निघाली !
(थोडा वेळ जागच्या जागीच 'वन टू'ची ड्रिल करणे)
येरवड्याला आचार्य भागवत होते,
रावसाहेब पटवर्धन होते . . .
आम्हाला सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावलेल्या,
पण, *(सौम्य हसून)*
इतक्या जणांना देता येईल,
एवढं कठीण काम तिथं होतंच कुठं ?
''दगड गोळा करा !''
''करतो -''
''रस्ता बांधा ऽ ऽ''
''बांधतो !''
(हसून) तो कधीच पुरा झाला नाही !!
''कापडी पट्टे विणा -''
''विणा तर विणा !''

बाकी सगळा दिवस मोकळा -

(गंभीर होत)

आचार्य भागवत मला म्हणाले,

''मिळतील ती पुस्तकं वाचून काढ -''

ह. रा. महाजनींनी 'शाकुंतल' वाचनाचा वर्ग सुरु केला . . .

आचार्यांनी शेक्सपियरचं ''ज्युलियस सीझर' शिकवलं -

(ॲक्शन) ''ब्रूटस् यू टू ? देन फॉल् सीझर !''

(खुर्चीत कोसळतात)

(संथपणे, मान वर करुन)

ज्यांच्यावर भरोसा ठेवला,

तीच माणसं नंतर माझ्यावर उलटली,

हा अनुभव मी पुढं उत्तर आयुष्यात घेतला

तेव्हा त्या अवघ्या सहा शब्दात केवढं प्रचंड नाट्य भरलेलं आहे, ते जाणवलं;

आणि शेक्सपियर ४०० हून अधिक वर्षं का टिकला,

तेही कळलं !

(रंगमंच पूर्ण उजळतो)

तुरुंगात गांधीवाद, समाजवाद आणि मार्क्सवादसुध्दा

समजावून घेतला.

शेवटी मी ठरवलं :

''विचारांच्या क्षेत्रातला निर्णय आपला आपणच घेतला पाहिजे !''

रशियन राज्यक्रांतीविषयीचं :

'द टेन् डेज् दॅट शुक् द वर्ल्ड'

हे जॉन रीडचं पुस्तक वाचून काढलं -

व्हेरी इंटरेस्टिंग !

हिंदुत्वनिष्ठ राजकारणावर तुटून पडणारे आचार्य

भागवत सावरकरांच्या 'कमला' आणि 'गोमंतक'
या काव्यांवर बोलू लागले,
की त्यांची रसवंती तास न् तास वहात असे !
मी मनाशी म्हणालो,
''सावरकरांची कविता मी यापूर्वीच का वाचली नाही ?''
'कमला' या काव्याची सुरुवातच ललितरम्य आहे :
'फुलबाग किती शोभे लहान नटवी, करी
नटुनि थटुनि नाना नखरे वरचे वरी'

एकदा काय झालं :
चांगले वकील असलेले गृहस्थ आचार्यांना म्हणाले,
''मी टागोरांची 'गीतांजली' वाचतोय्, पण -
'दाऊ' म्हणजे काय ? 'हिम्' म्हणजे कोणाला हो ?''
आचार्य भागवत संतापानं लाल झाले, म्हणाले :
''गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांची नोबेल पारितोषिक विजेती 'गीतांजली' तुम्ही वाचताय् -
आणि
तुम्हाला 'दाऊ' आणि 'हिम'चा अर्थ कळत नाही !
(भडकून) वाचन बंद करा - बंद करा वाचन !!!''
फॅशन म्हणून अभिजात ग्रंथ उघडून बसणारी माणसं
त्या काळातही होती -
आजकालच्या फॅशनेबल बायका नाही का म्हणत :
''आज किनई कुमार गंधर्व 'क्लासिकल् फोक्' सादर करणार आहेत !''
त्यांना 'क्लासिकल'ही कळत नाही,
आणि
'फोक्'मधलंही काही कळत नाही !
फोकानं झोडून काढलं पाहिजे !!

विनायकराव भुस्कुटे यांच्याकडून
'कम्युनिस्ट मॅनिफॅस्टो' समजावून घेतला.
इतिहासाच्या विकासाकडे पहायची एक 'नवी नजर'
मार्क्सनं जगाला दिलीय् !
मला वाटतं :
'मार्क्सच्या विचारांकडे पाठ न फिरवता,
हिंदुस्थाननं आपले प्रश्न
आपल्या अनुभवातूनच सोडवले पाहिजेत !'
मार्क्सवादाच्या अंमलबजावणीत कुणी काही चुका
केल्याही असतील,
पण म्हणून मूळ मार्क्सवाद टाकाऊ कसा ठरतो ?
कारण,
खुद्द मार्क्सनं एके ठिकाणी म्हटलंय् :
'येस् येस्- थिअरी ईज ग्रीन,
बट् - लाईफ ईज एव्हरग्रीन !!'
काही 'बडवे' पोटभरु निघाले,
म्हणून ज्ञानेश्वरी टाकाऊ ठरते का ?

येरवड्याला एक वर्षं,
विसापूरला तीन महिने काढल्यावर,
'३३ सालच्या मे महिन्यात सुटलो.
माझ्यातली भावनाशीलता कमी करुन
विचारांची खोली वाढवायचं काम
त्या तुरुंगवासानं केलं !
ते एक प्रकारे आमचं -
'विद्यापीठीय जीवन'च होतं . . .

सुटायच्या अगोदर एक दिवस महाजनी मला म्हणाले,
"वाचन पुष्कळ झालं !.
आता 'गांधीवाद' या विषयावर ३५-४० मिनिटं भाषण दे पाहू -"
चांगली तयारी करुन
मी भाषणात गांधीवादातली
'साध्य-साधन शुचिता' सांगितली !
वयाच्या १८ व्या वर्षाच्या मानानं,
चांगली मांडणी केल्याबद्दल
खुद्द महाजनी, निपाणीचे गांधीवादी पुढारी कटकोळ
या बुजुर्गांनी माझी पाठ थोपटली.

पण, तुम्हाला खरं सांगू ?
तुरुंगातनं सुटल्यावर,
घरचे कपडे घालताना मला चुकल्या-चुकल्यासारखं झालं !
माणूस सवयीचा किती गुलाम असतो नाही !
घरी आलो,
तर इकडे थोरल्या बंधूंना मुलगा झालेला,
तिकडे आमचे जुने मित्र अहमद कच्छी -
मृत्यूशय्येवर तळमळत होते . . .
नव्या अंकुराकडे आनंदानं पहावं,
तोच, गळून पडणाऱ्या पानाच्या छायेनं
मनात विषण्णता दाटून येई -
माणसाचं जीवन असंच
सुख-दुःखाच्या लाटांवर हिंदोळत असतं !

मी शाळेत जाऊ लागलो.
शिक्षणाचं, ज्ञानाचं महत्व चळवळीतही आहे;

हे मी तुरुंगातदेखील पाह्यलं होतं !
त्यामुळे मला आता मॅट्रिक व्हायची घाई झाली होती.
वाटायचं :
'आत्ताच्या आत्ता माझी परीक्षा कुणी का घेत नाही !'
पण, मध्येच मॅट्रिकची परीक्षा कोण घेणार हो ?
वर्षभर, लहान मुलांमध्ये बसणं भागच होचं !

मॅट्रिक झाल्यावर
एक दिवस कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांना बोलवायला
पुण्याला गेलो - स्टेशनवरच्या नळावरच हातपाय धुतले.
अण्णा घरीच होते -
मी आमंत्रण दिलं, तर ते म्हणाले :
''माझ्याबरोबर एखाद्या हरिजनालाही घरी जेवायला
बोलावशील ?''
(चटकन्) ''हो, बोलावीन की -''
''घरच्यांना विचारलं आहेस ?''
(चटकन्) ''आई नाही म्हणणार नाही !''
कर्मवीरांच्या संगतीतला तो एक दिवस,
म्हणजे, सार्वजनिक जीवनातला एक धडा होता, धडा !
त्यानंतर, मी महारवाड्यात काढलेली शाळा,
दोनतीन महिन्यातच प्रौढ विद्यार्थ्यांच्या अभावी बंद पडली.

खरं तर,
उच्च शिक्षण घ्यायजोगी आमची सांपत्तिक स्थिती नव्हती.
तरीदेखील,
मी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये दाखल झालो . . .

प्राचार्य बाळकृष्ण -
वृत्तीनं राष्ट्रीय,
इतिहासाचे विद्वान प्राध्यापक,
कुशल कारभारपटू,
आणि चांगले वक्ते होते !
कादंबरीकार ना. सी. फडके आम्हाला तर्कशास्त्र शिकवायचे.
'दौलत', 'जादूगार' ह्या गाजलेल्या कादंबऱ्यांचे जनक !
विषय सोपा आणि मनोरंजक करण्यात,
ते वाकबगार होते !
एखादी गाण्याची मैफल जमावी,
तसे त्यांचे तर्कशास्त्राचे तास जमून येत !!

एकीकडे शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्ट्या
मी माझं मन असं संपन्न करीत असतानाच,
गांधीजींचा 'हरिजन' नित्यनेमानं वाचीत असे . . .
अहो, घरुन येणाऱ्या पत्रासारखी,
मी 'हरिजन'च्या ताज्या अंकाची आतुरतेनं वाट पहात असे !
गांधीजींचे सरळ, साध्या, सोप्या इंग्रजीतले
गंभीर विचार वाचून,
मनाला एक प्रकारची शक्ती मिळत असे . . .
ते आमचं बौध्दिक 'टॉनिक' होतं, 'टॉनिक' !
काँग्रेस हाच आपला राजकीय पक्ष,
असं मी तेव्हाच मनोमन ठरवलं . . .

१९३४ च्या काँग्रेस अधिवेशनाला गेलो असताना,
मुंबईत मी साने गुरुजींना प्रथम पाह्यलं.
अहो, मुंबईसुध्दा मी प्रथमच पहात होतो !

गुरुजी गुडघे पोटाशी घेऊन
एकटेच चटईवर चिंतन करीत बसले होते.
माझी माहिती दिल्यावर, ते म्हणाले,
''छान, फा ऽ ऽ र छान !
काँ ऽ ऽ ग्रेसला अशा ऽ का ऽ र्यकर्त्यां ऽ ऽ ची फा ऽ ऽ र फा ऽ ऽ र गरज आहे ! . . . ये हो बा ऽ ऽ ळ !!

३५ सालच्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये,
मी टॉयफॉईडनं आजारी पडलो . . .
तरीही, प्राचार्य बाळकृष्णांनी
आपले खास अधिकार वापरुन
ती 'टर्म' मला दिली.
आणि, तुम्हाला सांगतो :
माझी स्वत:चीदेखील अपेक्षा नसताना,
मी 'इंटर' पास झालो !
मी ज्युनियर बी.ए.ला असतानाच,
३६ साली 'प्रांतिक'च्या निवडणुका आल्या -
आम्ही नव्या कार्यकर्त्यांनी
सातारला आत्मारामबापू पाटील,
यांच्या नावाचा आग्रह धरला -
(आवेशानं) असा शेतकऱ्यांचा तरुण आणि तडफदार
प्रतिनिधी कायदेमंडळात जाणं आवश्यक होतं !
सातारचे पुढारी भाऊसाहेब सोमण
यांच्याशी बोलूनच आम्ही थांबलो नाही,
तर थेट मुंबईला जाऊन सरदार वल्लभभाई पटेल
यांची पण भेट घेतली !
त्यांचे चिरंजीव, डाह्याभाई पटेल, यांनी अडवलं :

''शूं काम छे ?''
''फक्त दोन मिनीटं बोलायूचंय् सरदारांशी -''
''ठीक - ठीक छे -''
सरदार म्हणाले :
''अगर आ केण्डिडेट गिर जावे,
तो जिम्मेवारी कोणी ?''
(चटकन्) ''आम्ही - आम्ही कार्यकर्ते घेऊ ती जबाबदारी !''
काँग्रेस उमेदवारांची नाव जाहीर झाली,
त्यात आत्माराम पाटलांचं नाव होतं !
आम्ही सगळे तरुण कार्यकर्ते
उत्साहानं त्यांच्या प्रचाराला लागलो . . .
'लाऊडस्पीकर' प्रथम वापरण्यात आला,
तो या निवडणुकीत !
पंडित नेहरुंची विराटसभा कराडमध्ये झाली.
आत्माराम पाटील,
सर्वात जास्त मतं मिळवून निवडून आले.
त्यांच्या प्रचारासाठी आम्हाला खुद्द मानवेंद्रनाथ रॉय लाभले होते !

सत्तेपासून लांब रहावं,
या मोहात गुंतू नये,
असं म्हणणाऱ्या संन्याशांचा एक वर्ग
त्यावेळी काँग्रेसमध्ये होता !
ह्या पोकळ सोवळेपणात काहीही अर्थ नाही,
आणि जनतेची शक्ती
अधिक प्रमाणात संघटित करावी,
असंच मला नेहमी वाटत आलंय्.
एक दिवस माझा मित्र दयार्णव कोपर्डेकर

आपल्या नियोजित वधूला घेऊन आला . . .
साने गुरुजींचं 'श्यामची आई'
हे हस्तलिखित त्यानं बरोबर आणलं होतं !
ते त्यानं प्रसिध्द करावं,
अशी गुरुजींची इच्छा होती . . .
'श्यामची आई' मी हस्तलिखित स्वरुपात वाचली,
हे माझं भाग्य !
अनेकदा डोळे पाणावले - अनेकदा -
'आई' म्हटलं की, मी भावनेनं दुबळा होतो . . .
त्यात गुरुजींचं प्रत्येक वाक्य
भावनेनं ओथंबलेलं,
आईच्या प्रेमानं ओसंडून चाललेलं !
वाचन संपल्यावर मी दयार्णवला मिठीच मारली.
म्हणालो : ''तुझं हे प्रकाशन खात्रीनं यशस्वी होईल !''

१९३८-३९ साली बी.ए. झाल्यावर
पुढं काय ? - असा प्रश्न होता.
संपादक की, शिक्षक ?
वकील व्हायचा विचार त्यावेळी नव्हता !
पण शेवटी,
'राजकारण आणि वकिली'
हातात हात घालून चालताहेत, हे पाहिलं -
आणि
कायद्याचा अभ्यास करायचं ठरवलं . . .
राजकारण करायचं,
पण राजकारणात कुणाबरोबर रहायचं ?
काँग्रेसचं व्यासपीठ मी मूलभूत मानतो;

आणि त्याचबरोबर समाजवादही स्वीकारतो !
विचारात जे बदल व्हायचे,
ते शेवटी जन-आंदोलनाच्या अनुभवातूनच झाले पाहिजेत . . .
'३४ साली नाशिक-जेलमध्ये स्थापन झालेल्या
'काँग्रेस समाजवादी पक्षा'पेक्षा,
मला रॉयवादी विचार अधिक पटत होता.
मनाची अवस्था एक प्रकारे द्विधा झाली होती . . .
पण, अशी द्विधा अवस्था झाल्याशिवाय,
विचारांचा विकास तरी होणार कसा ?
That is the dynamics of development !
मात्र, एक गोष्ट मला खटकायची :
हे रॉयवादी, समाजवादी पंडित
लहान लहान प्रश्नांवर एवढे मतभेद माजवताहेत,
हे शेवटी काँग्रेसला कमजोर तर करणार नाहीत ?
रॉयिस्ट, सोशालिस्ट, कम्युनिस्ट -
त्यावेळी सगळे काँग्रेसमध्ये होते . . .
पुढं त्यांच्या वाटा वेगळ्या झाल्या !

आम्ही 'लोक-क्रांती' नावाचं साप्ताहिक सुरु केलं.
'लोकक्रांतीचा जीवनहेतू'
हा पहिला अग्रलेख मीच लिहिला होता !
पण, पुढं कायद्याच्या अभ्यासासाठी पुण्याला गेलो;
हे साप्ताहिक वर्षभर चाललं,
नंतर बंद पडलं -
माझ्या मनातला वैचारिक त्रिकोण
एव्हाना संपला होता :
'जिथं गांधी-नेहरु, तिथं मी !'
असं स्वच्छ उत्तर होतं !

आत्माराम पाटील रॉयवाद्यांबरोबर गेले,
मी काँग्रेसबरोबर राह्यलो.

पुण्याच्या लॉ-कॉलेजची इमारत पहाताच,
मन प्रसन्न झालं !
हनुमान टेकडीच्या उतरणीवरुन अर्धं पुणं दिसतं -
चांगली लायब्ररी,
वाचनाची व्यवस्थित सोय,
उत्तम वातावरण - आणखी काय हवं ?
'सा विद्या, या विमुक्तये !'

त्या काळात पुण्यात
'अभ्यास-मंडळां'ची फॅशन होती -
Study Circle !
म्हणजे, पालक म्हणायचे :
'अभ्यासाचं वाट्टोळं !'
आणि ते खोटं नव्हतं -
मी विष्णुपंत चितळ्यांकडून
मार्क्सवाद समजावून घ्यायचा प्रयत्न केला.
कायद्याचा सोडून, बाकीचाच अभ्यास जास्त केला !
परिणाम ?
'३८ साली 'फर्स्ट एल्.एल्.बी.ला
मी नापास झालो !!

'३९ सालच्या सप्टेंबरमध्ये,

इंग्लंड-फ्रान्स विरुध्द जर्मनी -
असं दुसरं महायुध्द पेटलं . . .
लोकशाही विरुध्द फॅसिझम्
या लढ्यात लोकशाहीचा विजय होणं इष्ट,
पण, गुलाम हिंदुस्थानला
या युध्दाशी काहीही कर्तव्य नाही,
अशी काँग्रेसची भूमिका होती.
तर, साम्यवाद्यांच्या मते,
'फॅसिझम्विरुध्द लढायला उभ्या राहिलेल्या
ब्रिटिश सत्तेशी
आपण तूर्त सहकार्य केलं पाहिजे !'
२२ जून '४१ ला
जर्मनीनं रशियावर हल्ला केला,
आणि
कम्युनिस्ट पक्षही या युध्दाला
'लोकयुध्द' म्हणू लागला . . .
मी अतिशय अस्वस्थ झालो -
कारण,
काँग्रेस युध्दविरोधी कार्यक्रम देत नव्हती.
'कम्युनिस्ट पक्षात जावं की काय ?'
असा एक प्रबळ विचार माझ्या मनात येऊन गेला !
पण,
जिल्ह्यातले मित्र म्हणाले :
''घाईघाईनं, एकांगी आणि चुकीचा निर्णय घेऊ नका.''
हे ठरलं,
त्या दिवशी रात्री मी निवांत झोपलो !

युध्द संपल्यावर,

पुढं केव्हातरी 'वसाहतीचं स्वराज्य' देऊ,
- संपूर्ण स्वातंत्र्य नाहीच -
असा वायद्याचा सौदा इंग्रजांनी पुढं मांडला,
आणि देशात संतापाची लाट उसळली !
९ प्रांतातल्या काँग्रेस-सरकारांनी
राजिमाने दिले,
आणि 'प्रत्यक्ष कृती'ला सुरुवात केली.

तिकडं युध्द चाललंच होतं -
पॅरिस पडलं, जर्मनीनं फ्रान्स गिळंकृत केला,
आणि मी कष्टी झालो !
इतिहासाच्या अभ्यासानं निर्माण झालेले
बौध्दिक आणि भावनात्मक ऋणानुबंध
हे असे मनस्वी असतात !
फ्रेंच राज्यक्रांती करणारा फ्रान्स
हिटलरनं घशात घातला,
म्हणून मी व्यथित झालो;
Liberty, fraternity आणि equality
हा महामंत्र जगाला देणारा फ्रान्स गुलाम झाला,
म्हणून मी शोकसागरात बुडालो !
आणि तिकडे काकासाहेब गाडगीळ मात्र
तुरुंगातल्या कम्युनिस्टांना चिडविण्यासाठी म्हणायचे :
'आठ दिवसात फ्रान्स पडला,
आता १५ दिवसात मॉस्कोवर हिटलरचं स्वस्तिक झळकणार !
लावता पैज ?'
इतका आंधळा कम्युनिस्ट द्वेष मी कधी केला नाही.
आंधळी व्यक्तिपूजा,

आणि आंधळा द्वेष -
माझ्या स्वभावातच नसावा !

महात्मा गांधींनी असहकार चळवळीचं नेतृत्व स्वीकारलं,
आणि
प्रतिकात्मक अशा वैयक्तिक सत्याग्रहासाठी
आचार्य विनोबा भावे,
यांचं नाव घोषित केलं . . .
व्यंकटराव पवार जेलमध्ये गेले,
आणि मी सातारा जिल्हा काँग्रेसचा अध्यक्ष झालो.
वैयक्तिक सत्याग्रहात
कराडला वालचंद गांधींचं नाव मंजूर झालं;
पण, ते मला म्हणाले :
'जेलमंदी मी जाईन, पर भाशन तमेच कर जो !'
म्हटलं, ''छान आहे ! सत्याग्रह वालचंद करणार
आणि भाषण मी करायचं ! विनोदच आहे !!' *(हशा)*
माझं भाषण झालं,
वालचंदनी युध्दविरोधी घोषणा दिल्या,
पोलिसांनी त्यांना अटक केली;
मी पोलिसांना विचारलं :
''माझ्या भाषणात आणि त्यांच्या घोषणात
काय फरक होता ?''
''इतक्या खोलात कोण जातो ?'' *(मोठा हशा)*
''याला पकडा म्हटलं की,
त्याला पकडायचं - बस्स!'' *(आणखी हशा)*
हेच पोटार्थी नोकरशाहीचं वैशिष्ट्य . . .

लॉ-कॉलेजसमोर,

मी 'अध्यात्म-भवन'मध्ये रहायचो.
आमचा मित्र अयाचित, आर.एस.एस.कडे झुकला !
मी पक्का आरेसेस्-विरोधी
बिडेश कुलकर्णी आले की, म्हणायचे :
''काय खाकसार ! करायची का चर्चा ?''
हैदराबादचे एकांगी खाकसार,
आणि हे संघवाले -
सारखेच झापडबंद !
त्यामुळे 'खाकसार' ही टोपी,
त्यांना फिट्ट बसायची !

मी एल्.एल्.बी. झालो -
आईला खूप आनंद झाला; म्हणाली,
''आता लगीन करुन घे बाबा -''
फलटणच्या रघुनाथराव मोऱ्यांची कन्या
वेणूबाई सांगून आली;
तिच्या चेहऱ्यावर
मला विलक्षण सौम्य अशी प्रसन्नता दिसली !
मी आईला होकार कळवला -
२ जून '४२ ला आमचं लग्न झालं . . .
माझ्या अंत:करणाच्या गाभाऱ्यात, एक तेजस्वी निरांजन प्रज्वलित झालं,
त्यानंच माझं पुढचं सगळं वैयक्तिक जीवन उजळून निघालं !

'४२ चा लढा उंबरठ्यावर आला असताना मी लग्न केलं . . . तर्क आणि
जीवन हातात हात घालून चालतातच, असं नाही !
७ ऑगस्टला नेहरुंनी 'छोडो भारत'चा ठराव मुंबईच्या गोवालिया टँक

मैदानावरच्या सभेत मांडला . . . गांधीजी म्हणाले :

''हा शेवटचा लढा आहे - "Do or die !"

'जिंकू किंवा मरु !' असाच लोकांचा निर्धार होता ! . . . ९ ऑगस्टला जनता रस्त्यावर आली,

कारण,

पहाटेच ब्रिटिशांनी महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद - सगळ्या नेत्यांना अटक करुन अज्ञात स्थळी नेलेलं होतं !

लाठीमार, अश्रुधूर, दगडफेक . . .

चवताळलेल्या मुंबापुरीचं हेही रुप पाहून घ्यावं . . . चौपाटीपर्यंत चालत गेलो !

'आता भोळेपणानं तुरुंगातजायचं नाही . . . भूमीगत राहून चळवळीची कामं करायची,' असा मनोमन निश्चय केला -

एखादा विचार जादूनं सगळीकडं पसरावा, तसा 'Quit India' चा नारा देशाच्या काना-कोपऱ्यात पोचला होता !

तीन-चार दिवस पायी, सायकलनं, रेल्वेनं प्रवास केला. पुण्यामध्ये पण मुंबईसारखीच निदर्शनं झाली. मी तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसून कराडला निघालो . . . पण, पहाटे मुद्दामच शिरवड्याला उतरलो. तिथून मसूर जवळ; पण तिथल्या सगळ्या कार्यकर्त्यांना अटक झाल्याचं समजलं.

मग ठरवलं :

'मसूरला न जाता, इंदोलीला जावं !'

छोटीशी बॅग घेऊन पायीच निघालो -

उजाडल्यावर, मला कुणीतरी पाह्यलं आणि ओळखलं :

''इकडं कुठं चाललात ?''

''जास्त चर्चा करु नका. यायचं असेल, तर माझ्याबरोबर या -''

अनोळखी असूनही त्यानं माझी बॅग घेतली. मग, मी त्याला म्हणालो :

''माझ्याबरोबर इंदोलीला चल -''

कृष्णा ओलांडून त्यानं मला पेर्ल्याला नेलं ! पेर्ल्याहून सातारा ओलांडून

इंदोलीला आलो . . . दिनकरराव निकमांना निरोप धाडला. ते एकदोन मित्रांना घेऊन आले. आंदोलनाचा कार्यक्रम त्यांनाही हवाच होता !

३-४ दिवस चालून मी इतका दमलो होतो की, १० तास अखंड झोपलो.

असा आमचा भूमीगत जीवनक्रम सुरु झाला !

वेणूबाईला पत्र लिहून तिची क्षमा मागितली : ''मी एका वादळात तुझ्यासह घुसत आहे ! कदाचित्, तुझ्यावरही संकट येईल. धीरानं वाग !''

आठ दिवसात, शंकरराव बेलापुऱ्यांच्या फटफटीवर मागं बसून कवठं, तांबवं, येळगाव घेतलं . . . किसनवीरांना निरोप धाडला, तर -

''भूमीगत यशवंतराव आलेत हो !'' *(हशा)*

अशी हाळी देऊन त्यांनी गाव गोळा केला. यापूर्वी आम्ही कुणीच underground काम केलं नव्हतं ना !

मात्र मग ते म्हणाले :

(खासगीत) ''आता इथं थांबायचं नाही -''

तालुक्याचे ठाणेदार फौजफाटा घेऊन आले असतील, असं त्यांना वाटलं . . . पण, ते दुसऱ्या दिवशी आले *(हशा)* पोलिस खात्याची ही खास परंपरा आहे. *(मोठा हशा)*

कराडचा मोर्चा २४ ऑगस्टला ठरला. आसपासच्या खेड्यातनं हजारो लोक मामलेदार कचेरीवर जमले . . . दादासाहेब उंडाळकरांना अटक झाली. तरीही -

''आपला विजय झाला !''

ह्या भावनेनं लोक घरोघर परत गेले. ब्रिटिशांच्या दडपशाहीला न घाबरता एवढ्या मोठ्या संख्येनं लोक जमले, हेच पुढचं पाऊल होतं . . .

मग, मी कार्यकर्त्यांना ५-६ कलमी कार्यक्रम दिला. काँग्रेसच्या मूळ धोरणाशी सुसंगत, ब्रिटिश सत्तेचं वर्चस्व कमी करणारा, तिची भीती नाहीशी करणारा -

''शेतकऱ्यांची संघटना जर आपण बांधू शकलो, तर 'करबंदी' सारखी मोठी चळवळसुध्दा आपण हाती घेऊ शकू !'' असा विचार करुन मी चळवळ संघटित करु लागलो.

किरवे गावाच्या शेजारी, विठ्ठलबुवा मावशीकर, सुपन्याचे बाब शिंदे - अशा अनेक भूमीगत कार्यकर्त्यांची मी बैठक घेतली . . . अवती भवती पिकांची दाटी, समोर संगमाचा डोह - ही जागा चर्चेसाठी निवांत होती ! इथंच आम्ही पाटणच्या मोर्चाची तयारी केली.

कराडनंतर पाटणचा मोर्चा यशस्वी झाला !

तासगावला तर, आम्ही नवे न्यायाधीश, महसूल-अधिकारी निकम यांनी आधी गांधी टोपी घातली *(सौम्य हशा)*, आणि मग, मामलेदार कचेरीवर तिरंगी झेंडा फडकावला.

('महात्मा गांधी की जय', 'भारतमाता की जय' ह्या घोषणा ऐकू येतात)

जन-आंदोलनाच्या ह्या यशानं चिडून जाऊन ब्रिटिशांनी वडूज आणि इस्लामपूरच्या मोर्चांवर अमानुष गोळीबार केला :

८ ठार, ३३ जखमी !

हे सगळे मोर्चे म्हणजे '४२ च्या आंदोलनाच्या इतिहासातलं सोनेरी पान आहे, सोनेरी पान . . .

(उसासून) इस्लामपूरच्या मोर्च्यात बळी पडलेले इंजिनियर पंड्या - सदाशिव पेंढरकरचा मित्र . . . मूळचा उत्तर प्रदेशातला, शरीरानं बलदंड, बुध्दिमान, देशभक्त - म्हणाला,

''मला एकदा पहायचंय् - तुमच्या महाराष्ट्रात जनतेची चळवळ कशी चालते ती ! . . . प्रत्यक्ष भाग घेतल्याशिवाय कळणार नाही.''

तरुण पत्नी घरात ठेवून,

हा तरुण इंजिनियर इस्लामपूरला गेला,

आणि परत आलाच नाही. . .

मी त्याला परावृत्त करू शकलो नाही, याचं मला फार वाईट वाटलं.

(आवेशानं) ''आता अशी आपली माणसं बळी जाऊ द्यायची नाहीत !''

''युध्द-साहित्य नेणाऱ्या गाड्या उडवा -''

''रेल्वे-स्टेशनं, पोस्ट-ऑफिसं जाळा-पोळा !''

''स्वसंरक्षणासाठी हत्यारसुध्दा वापरायला हरकत नाही -''

''सरकारी कारभार-यंत्रणा खिळखिळी करा !''

''एका यशवंतरावाला अटक झाली, तरी सगळा सातारा यशवंतरावमय झालाय् -''

असाच सूर रेठरे-बुद्रुकच्या शरदराव ढवळ्यांच्या मळ्यातल्या बैठकीत दिसून आला.

(वेगानं) किसनरावांना अटक झाली, पण ते छन्नूसिंग, पांडू मास्तर, बलदेवप्रसाद - अशा सगळ्या सहकाऱ्यांसह जेल फोडून बाहेर आले . . . २/२॥ महिने पध्दतशीर बांधणी झाल्यानं, सातारा 'पेटून' उठला होता.

क्रांतिसिंह नाना पाटील, जी. डी. बापू लाड, वसंतराव पाटील, बरडे गुरुजी, नागनाथ अण्णा नायकवडी - असे नवे नवे धाडसी कार्यकर्ते लढ्याच्या आखाड्यात उतरले होते !

मला पकडून देणाराला १०००/- रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं ब्रिटिशांनी -

(अभिमानानं आणि आवेगानं)

- सदाशिव पेंढरकरनं शिरवड्याचं स्टेशन जाळलं, आणि पोलिसांच्या बंदुकाच पळवल्या;

- माधवराव जाधवांनी भर दिवसा कराड पोस्टाचं सामान पळवलं;

- लक्ष्मणराव कासेगावकर, वैद्य - अत्यंत निधड्या छातीचा, आमच्या कृष्णा-कोयनेच्या आषाढ्-श्रावणातला महापूर ऐलतीर-पैलतीर पोहून जाणारा पठ्ठा -

(शांतपणे) उद्योगपती व्यंकटराव ओगले यांच्या घरी मुक्कामाला होतो. विमनस्क स्थितीत तेव्हा मी काही काळ सिगरेट ओढू लागलो होतो. *(झुरका मारल्याचा अभिनय)* . . .

इतक्यात,

निरोप आला :

''एक बंदूकधारी इसम तुम्हाला भेटायला आलाय् -''

''येऊ द्या !''

मी सिगरेट फेकली आणि पाह्यलं, तर -

कुंडलचे रामूमामा पवार !

रात्रीच्या वेळी रस्ता चुकून ते ओगलेवाडीला आले होते - मी रामूमामांना मिठीच मारली !

किती किती नावं सांगू ?

व्यंकटराव माने तर वाघ होते, वाघ !

पोलिसांनी चिडून कराड तालुक्यात थैमान मांडलं -

कराड शहरात रहाणं अशक्य झालं,

तेव्हा मी मसूर-खराडे गावच्या हद्दीत,

दत्तोबा आणि पार्वतीबाई काटकरांच्या जोंधळ्याच्या पिकात एक छोटीशी झोपडी बांधून राह्यलो.

तिथंच माझ्या कार्यकर्त्यांशी चर्चा होत असत . . .

भूमिगत अवस्थेत कार्यकर्त्यांशी संपर्क तुटला,

तर चळवळ बंद पडली,

असा त्यांचा गैरसमज होतो; म्हणून त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी अशा चर्चा आवश्यक असतात -

आणखी एक सांगतो :

'भूमीगत संघटना लोकजीवनाशी समरस झालेली असली, तर तिचा पाडाव शासन-यंत्रणा कधीही करु शकत नाही - कधीही नाही !'

लौकरच मला मुंबईला जावं लागलं . . .

तिथं अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, डॉ. राम मनोहर लोहिया यांची भेट झाली . . .

छान, मोकळा माणूस !

समोरच्या कार्यकर्त्याचा उत्साह वाढविणारा नेता -

भूमीगत अवस्थेत असा नेता भेटणं महत्वाचं !

(किंचित् हसून) काही काही नेते -

नुसतेच गडप होतात . . .
त्यांचा चळवळीला काय उपयोग ?
लोहियांना सातारच्या चळवळीची हकीकत सांगितली,
तेव्हा ते म्हणाले :
''जन-आंदोलन वाढविण्याकरीता,
पुढचं पाऊल म्हणून काही त्याग करावाच लागतो !
वादळामध्ये जशी नौका सोडून द्यायची असते,
तसाच हा प्रयत्न असतो . . .
क्रांतीच्या चळवळीत काही बलिदान अपरिहार्य असते !
या चळवळीच्या निमित्तानं,
गरीब, दलित, मागास वर्गीयांपर्यंत जा !
त्यांच्यातले कार्यकर्ते उभे करा !!

एसेमना भेटलो.
बोहोरी मुसलमानाला शोभेल अशी दाढी,
टोपी, विजार, लांब कोट -
अशा वेषात ते मला भेटल्याचं आठवतं !

मुंबईतल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत कुणी म्हणालं :
'रशियासारखं 'दग्धभू धोरण' आपणही अवलंबावं - म्हणजे उभी पिकं जाळणं वगैरे -
मी स्पष्ट सांगितलं :
''पिकं जाळणं म्हणजे लोकांशी लढाई !
तिच्यात शेवटी,
लोक-लढ्याचंच नुकासन होईल -''
आणखी कुणी म्हणालं :

''गुन्हेगार-वृत्तीच्या, फरारी पण संघटित
टोळ्यांचं इंग्रजांविरुध्द सहकार्य घेऊ ना ?''
म्हटलं, ''ते सुरवातीला सोयीचं वाटलं,
तरी शेवटी चळवळीच्या शुध्दतेला बाधक ठरेल !''

'४२ डिसेंबरातली,
कोवळं चांदणं ल्यायलेली रात्र . . .
डोक्याला फेटा बांधून,
केशवरावांच्या सायकलवरनं,
सरळ कराडला घरी गेलो -
थोरल्या बंधूंची आणि माझी,
ही शेवटचीच भेट होती,
याची मला कल्पनाच नव्हती . . .
मधले बंधू गणपतराव,
विजापूर तुरुंगात होते . . .
खरं तर,
मला शक्य तितक्या लवकर पुण्याला पोचायचं होतं.
अंगात जोधपुरी कोट,
डोक्याला फरची टोपी,
अशा थाटात, सरळ आगगाडीच्या डब्यात बॅग घेऊन बसलो . . . वेळ रात्रीची . . . डब्यात मी एकटाच -
इतक्यात,
एक हेड-कॉन्स्टेबल आला !
म्हटलं, ''आता हा अटक करणार !!''
''कुठं जाणार ?''
''पुण्याला -''
''तिकीट काढलंय ?''

''माणूस पाठवलाय् - नाही आला, तर देईन गार्डाला पैसे''
''गार्डाला कशाला ? मी आहे ना -?''
म्हटलं, ''वाचलो ! . . . पैसे ह्यानं खायचे की, गार्डानं ? एवढाच प्रश्न होता !'' *(हशा)*
रात्रभर निवांत झोपलो.
घोरपडीला त्यानं मला उठवलं,
मी त्याला पैसे दिले,
त्यानं मला सलाम ठोकला !

पुण्याच्या वास्तव्यात मी अस्वस्थच होतो . . .
थोरले बंधू ज्ञानदेवराव,
त्यांचा गणपतरावांवर फार जीव -
गणपतरावांना पकडल्यापासून
ज्ञानदेवरावांचं, पाठीच्या आवाळूचं दुखणं बळावलं;
ऑपरेशन करुन घ्यावं,
असं दादांनी ठरवलं . . .
ऑपरेशन झाल्यावर दादांची प्रकृति आणखी खालावली.
जखमेत 'सेप्टिक' झालं . . .
त्यातून न्यूमोनिया बळावला -
८/१० दिवस त्याच्याशी झगडून,
त्यातच दादांचा अंत झाला . . .
ही सगळी करुण कहाणी,
मला पुढं १५ दिवसांनी पुण्याला समजली -
आम्ही दोन्ही भाऊ जवळ नसताना,
दादांचा असा शोकांत व्हावा,
याचं मला वाईट वाटलं . . .
१४ जानेवारीला वेणूबाईला अटक झाली.

लग्नानंतरची पहिली संक्रांत,
तिनं जेलमध्ये काढली !
चळवळ संपल्यावर एक दिवस मी तिला विचारलं :
''पोलिसांनी तुला कशी वागणूक दिली ?''
''पोलिस नेहमी देतात, तशीच !''
ती नेहमीच कमी बोलायची, पण फार मार्मिक बोलायची !
प्रकृतिसाठी वेणूबाईला फलटणला धाडलं.
मेच्या मध्यावर मला निरोप आला :
''वेणूबाई मरणोन्मुख आहे -''
तो सबंध दिवस, ती सबंध रात्र -
मी झोपू शकलो नाही . . .
सूर्योदयापूर्वी फलटणला जाऊन थडकलो !
दुसऱ्या दिवशी दुपारी,
फलटण-संस्थानच्या पोलिसांनी घराला वेढा घातला -
- आणि माझं भूमीगत आयुष्य संपलं !!

फलटणच्या नव्या तुरुंगातला,
मी पहिला राजबंदी !
८/१० दिवसांनी ते मला सातारा जेलमध्ये घेऊन गेले.
तिथं मला दरोडेखोर रामोशी कोतावडेकर भेटला -
दरोडे घालण्यातसुध्दा त्याचे नियम असतात ! *(सौम्य हशा)*
हे त्यानं मला सांगितलं - म्हणजे ते त्यांच्या नियमानुसार आपले नियम मोडतात !! *(हशा)*
- पंचांग पाहून दिशा ठरवायची, दिवस ठरवायचा !
- आपला गाव ज्या पोलिस स्टेशनच्या हद्दीत आहे, त्या आणि शेजारच्याच गावात दरोडा घालायचा !!
- बायकांच्या अंगावर हात टाकायचा नाही !! . . . आणि

- दरोड्यातली चौथा हिस्सा कमाई, गोरगरीबांना वाटायची -
असे त्यांचे नियम असत !

सातारा आणि पुणे सर्कलच्या पोलिसांनी मला ठोकळेबाज आणि निर्बुध्द प्रश्न विचारले :

''आणखी कोण होतं तुमच्याबरोबर ?''
''काय काय केलं तुम्ही ?''
''तुम्हाला आसरा कुणी दिला ?''
''पैसे कोण द्यायचं ?''

मला वाटलं होतं : पोलिस असतील अडाणी, पण अधिकारी ?
ते तरी सुबुध्द प्रश्न विचारतील -
चळवळीबद्दल ज्ञान दाखवतील
पण, सगळाच उजेड !
मी मनातल्या मनात पोलिस खात्याची कीव केली.

मला ६ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली.
'ब' वर्ग मिळाला -
४-६ दिवसांनी येरवड्याला रवानगी . . .
पुन्हा त्या राहुट्या !
मनाशी म्हटलं :
'जेलमध्ये राहुट्यांचाच योग दिसतोय् !'
त्यामुळे ओळखीच्या घरी आल्यासारखं वाटलं . . .
वाचण्याची व्यवस्था उत्तम होती.
आर्थर कोएस्लरची
"Darkness at noon !"
ही कादंबरी मी इथंच वाचली :
स्टॅलिनच्या राजवटीनं केलेल्या राजकीय छळाची
ती हृदयद्रावक कहाणी,

कलापूर्ण असूनही - मला प्रचारकी थाटाची वाटली.

चर्चा आणि वाचन,
यात ५-६ महिने कधी गेले,
ते कळलंच नाही !
निरोप आला :
''तुमची शिक्षा संपलीय् -''
म्हटलं, ''सरकारचा आणखी काही हुकूम ?''
''काही नाही - तेव्हा आता तुम्हाला सोडून देणंच भाग आहे !''
(सौम्य हशा)
एक वर्षानं घरातल्यांना परत भेटलो.
गणपतराव क्षयानं आजारी होते . . .

दोन-तीन आठवड्यातच,
मला तिसऱ्यांदा अटक झाली -
यावेळी त्यांनी मला 'क' वर्ग दिला.
आता मात्र माझ्या मनातला संघर्ष शिगेला पोचला :
दादा गेले,
गणपतराव अंथरुणाला खिळलेले,
वेणूबाईची प्रकृति तोळामासा,
आई काहीही न बोलता,
सगळं सहन करतेय् - पण, विलक्षण दु:खी आहे.

. . . १९४५ साल. मे महिन्यात महायुध्द संपलं;
मी 'पॅरोल'वर सुटलो -

जुलैत सत्तांतराची चर्चा सुरु झाली.
घटनांना वेग आला . . .
निवडणुकीचे वारे वाहू लागले;
ही उजाडण्यापूर्वीची पहाट होती -
(चिमण्यांचा चिवचिवाट, भूप रागाची सुरावट ऐकू येते)
ह्या निवडणुका घ्यायला,
ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल उत्सुक नव्हते.
जुलैच्या शेवटच्या आठवड्यात,
स्पेनच्या सीमेवर,
एका अतिशय सुंदर स्थळी,
ते विश्रांतिसाठी थांबले होते !
चित्र रंगवण्यासाठी त्यांनी कुंचला हाती घेतला,
आणि
हिंदुस्थानातल्या निवडणुकींची घोषणा त्यांनी ऐकली.
चर्चिल वैतागून म्हणाले :
''मी इथं चांगला चित्रकलेत गुंतलोय्,
आणि यांना तिकडं निवडणुका सुचताहेत !''
ब्रिटिश साम्राज्यावर,
'सूर्य कधीही मावळत नाही !'
अशी दर्पोक्ती काढणाऱ्या या 'बुल डॉग'नं
हिंदुस्थानातल्या निवडणुकींची
धास्ती घेतली होती !

उमेदवार म्हणून माझ्या नावाला सर्वात जास्त मतं मिळाली !
४० वर्षं मी निवडणुकींचं राजकारण खेळलो,
पण,
इतकी सरळ,

बिनखर्चाची, तत्वनिष्ठ -
आणि जनतेच्या उत्स्फूर्त पाठिंब्यावर झालेली
ही '४६ सालची एकमेव निवडणूक !!!
माझ्यासकट सातारा जिल्हा काँग्रेसचे
चारही उमेदवार प्रचंड बहुमतानं निवडून आले.
वेणूबाईनं मला ओवाळलं.
मी हळूच म्हणालो,
''ह्या यशात तुझाही वाटा आहेच !''
''अं हं - अशी वाटणी करायची नसते -''
जीवनात असे क्षण क्वचितच येतात.
- आनंदाचे, अंत:करण हेलावून टाकणारे . . .

मुंबईला आलो, तर निरोप आला :
''माधवराव देशपांडे तुम्हाला न्यायला आलेत !''
''कुठं ?''
''बाळासाहेब खेरांच्या बंगल्यावर !''
त्यावेळच्या मुंबई इलाख्याचे पंतप्रधान होते
बाळासाहेब खेर.
गेलो.
सौजन्यमूर्ती खेर म्हणाले,
''हॅं हॅं हॅं, मी तुम्हाला मंत्रिमंडळात घेऊ शकत नाही, पण - पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड केलीय् मी तुमची -''
(खचून बसत) खरं तर,
मनातून मी नाराज झालो होतो.
पण, सगळे म्हणाले :
''नाही म्हणू नका !''
वेणूबाई म्हणाली,

''आजवर एवढे कठीण निर्णय घेतले,
तेव्हा मनाची चलबिचल झाली नाही,
मग आताच असं का ?''
मी समजलो.
शेवटी आईला विचारलं - तर ती म्हणाली :
''मला मेलीला राजकारनातलं काई कळत नाय बग -
पर, तुला काइतरी नवं काम मिळतंय;
तर आता 'न्हायू' म्हनू नगंस !''
हा हायकोर्टाचा आदेश होता *(हशा)*

कृष्णाकाठी वाढलो;
माणसं जोडली - मोठा आनंदाचा आणि अभिमानाचा काळ होता तो !
(सन्तूरची हलकीशी सुरावट वाजू लागते)
संपूर्ण कृष्णाकाठ माझ्या प्रेमाचा, आवडीचा
आणि जिव्हाळ्याचा विषय . . .
माझं एक स्वप्न होतं :
महाबळेश्वरात उगमापासून निघावं,
आणि कृष्णामाईच्या काठा-काठानं थेट राजमहेंद्रीपर्यंत -
म्हणजे मुखापर्यंत चालत जावं !
बदलत्या पात्राची भव्यता पहावी,
निसर्गाचं सुंदरपण मनात साठवावं,
तीरावरच्या गावांना भेटी द्याव्यात,
लोकांच्या ओळखी करुन घ्याव्यात,
पिकांनी डोलणारी शेतं पहावीत -
पण,
कृष्णेच्या प्रवाहासारखीच,
माझ्या जीवनप्रवाहाला नवी खोली प्राप्त झाली आहे !

नव्या क्षितिजाकडं आता वेगानं निघालोय् -
रावसाहेब मधाळे म्हणाले :
''आज १४ एप्रिल -
बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिवस !''
म्हटलं,
''फारच चांगला योगायोग आहे !!''

❋ ❋ ❋

उत्तरार्ध

(पार्श्वसंगीत)

१९४६ च्या बेळगाव साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राचा पहिला ठराव मंजूर झाला. ध्येय सगळ्यांचंच एक होतं, पण मार्ग भिन्न होते.

आंध्रमध्ये पोट्टू श्रीमुलु यांचा आमरण उपोषणात बळी गेला, आणि मग ऑक्टोबर १९५३ मध्ये 'आंध्र प्रदेश' या तेलुगु भाषिक प्रांताची निर्मिती झाली.

१९५६ साली 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रा'साठी रान उठविण्यात आलं . . . २३ जानेवारीला चिंतामणराव देशमुखांनी अर्थमंत्रीपदाचा राजिनामा दिला आणि द्वैभाषिक आलं. मोरारजीभाईंना अविरोध निवड हवी होती, या गोष्टीला भाऊसाहेब हिरे यांचा विरोध होता.

मग, भाऊसाहेबांत आणि माझ्यात चुरस झाली. त्यांना १११ आणि मला ३३३ मतं पडली ! . . . द्वैभाषिकाचा मुख्यमंत्री होताच, मी आधी मंत्र्यांच्या बंगल्याची नावं बदलली :

'सह्याद्री', 'रामटेक', 'वर्षा', 'मेघदूत', 'अजिंठा' - अशी मराठी संस्कृतीची छाप असलेली नवी नावं दिली बंगल्यांना !

एक पार्टी होती सह्याद्रीवर . . . त्यावेळी महाराष्ट्र सरकारचे मुख्य सचिव होते भटसाहेब. ते खुर्चीत पडले -

मी लगेच त्या धक्का देणाऱ्या पुढाऱ्याला म्हटलं,

बघा, आय.ए.एस. अधिकारी पडला, तरी तो नेमका खुर्चीत पडतो !

मुंबई महाराष्ट्राला नको असं मी कधीही म्हटलं नव्हतं. ' मुंबईसाठी चळवळ नको, एवढंच माझं म्हणणं होतं. मुंबई मिळाली नाही, याचं मलाही दुःख आहे. पण म्हणून काय देश जाळायचा?

हाही एक प्रकारचा देशी वसाहतवादच आहे.

दिल्लीतला काँग्रेस 'हाय कमांड'ला राजकीय आव्हान न देता, आपलं म्हणणं कसं पटवायचं, असा पेच माझ्यापुढे होता.

(खवळून) 'काय म्हणालात ? मी सूर्याजी पिसाळ ? मग, शिवाजी कोण ?

. . . तो काय असे काळे झेंडे घेऊन फिरायचा ? (थांबून) मला बदनाम करा, पण सत्य कधीही बदनाम होणार नाही !

चौपाटीवरच्या सभेला पं. नेहरू संतापूनच आले.

'अगर उनको मेरा सिर लेना है,

तो लेने दो --

but,let them remember,

Govt will not collapse on this issue !

अशा तापलेल्या वातावरणातच १९५७ च्या निवडणुका आल्या. परिस्थिती एकूण कठिणच होती . . . . .

कराडला माझ्या अगोदर माधवराव बागत याचं भाषण झालं. ते म्हणाले,

'आता मरण्यापूर्वी मला यशवंतरावांचा पराभव झालेला पहायचा आहे, यंदा तेवढा पाहिला की, मी मरायला मोकळा झालो !

काँग्रेसचे कार्यकर्ते कासावीस झाले.

त्याच दिवशी, त्याच ठिकाणी नंतर आमची सभा झाली. मी शांतपणे म्हणालो,

''माधवराव बागल यांच्या समाजसेवेविषयी माझ्या मनात अतिशय आदर आहे. समाजालाही त्यांची फार गरज आहे. . . त्यांना उदंड आयुष्य लाभावे, म्हणून आपण मला यंदा निवडून द्या ! *(टाळ्या)*

पूर्वीच्या काळात राजा राणीच्या पोटातून जन्माला यायचा . . . आताचा राजा मताच्या पेटीतून जन्माला येतो ! . . . राजाधिराज मतदारांनो, उद्या सकाळी लौकर उठा, स्नान करा, श्रध्देनं या आणि काँग्रेसला मत द्या !'' *(टाळ्या)*

मी मुख्यमंत्री झालो.

आईचा आशिर्वाद घ्यायला गेलो . . . आपला पोरगा 'साहेब' झाला, हे तिला कळलं. तिच्या डोळ्यात अश्रू होते - ते आनंदाश्रू होते ! त्यांना मोत्याचं मोल होतं !!

महाराष्ट्राला हे असं ग्रहण लागलेलं असतानाच, त्यावेळचे 'लोकसत्ते'चे

संपादक ह. रा. महाजनी यांनी बेळगावच्या प्रश्नावर सरकारविरुध्द लेखामागून लेख लिहायचा सपाटा लावला. एक दिवस, मी स्वत: सकाळी ११ वाजता फोन करुन त्यांना विचारलं :

"Are you on war-path with me ?"

''नाही, प - पण - स्साहेब - ''

(आवाज चढवून) "Are you on war-path with me ?"

''तसं नाही, पण - साहेब -''

(आणखी उंच स्वरात) "Are you on war-path with me ?"

- आणि मी फोन ठेवून दिला !!

थोड्याच दिवसांनी, संक्रांतीचं निमित्त साधून ह. रा. महाजनी, सौ. महाजनी चांदीच्या वाटीत तिळगूळ घेऊन 'सह्याद्री'वर आले. हास्यविनोद झाल्यावर निरोप देताना मी महाजनींना म्हणालो,

''सरकारवर टीका करायचा अधिकार तुम्हाला निश्चितच आहे. पण, crisis च्या वळी 'लोकसत्ते'चा १० टक्के पाठिंबा 'विशाल सह्याद्री'च्या १०० टक्के पाठिंब्यापेक्षा मी जास्त मोलाचा मानतो.''

तसा मुख्यमंत्री-पदाचा मुकुट काटेरीच असतो !

''फड नासोचि नेदावा
पडिला प्रसंग सावरावा
अतिवाद न करावा
कोणी एकासी ।।''

हे समर्थ-सूत्र मनात बाळगूनच मी व्यवहार करीत राह्यलो. शेवटी, 'संयुक्त महाराष्ट्राचा मंगल-कलश मी आणला, असे लोक बोलू लागले. खरं तर, समितीच्या कर्तृत्वाचं यश मी केव्हाच मोकळेपणानं मान्य केलं होतं.

एकच प्रसंग सांगतो :

पं. नेहरुंना काळी निशाणं दाखविणारा मोर्चा वाईहून निघाला, तो पोलिसांनी गल्लीतच अडवला. मी त्यांना म्हटलं,

''असं करु नका ! पंडितजींना लोकांचा संताप तर दिसलाच पाहिजे . . मोर्चा हमरस्त्यापर्यंत, पंडितजींच्या नजरेच्या टप्प्यात येईपर्यंत पुढं येऊ द्या ! आणि एसेमना

माझा निरोप सांगा : म्हणावं, मोर्चा शांतपणे येईल, एवढी काळजी घ्या.''

२७ एप्रिलला आम्ही शिवनेरीवरुन जगाला गर्जून सांगितलं :

''महाराष्ट्र राज्याच्या निमित्तानं आज एक नवं कर्तृत्वं जन्माला येतंय . . . तृप्तीचा हा क्षण छत्रपतींच्या पुण्याईनं पहायला मिळाला !

(तुतारीचा मंगल ध्वनी)

ही राजसत्ता लोक-कल्याणासाठी राबणार आहे. ४०० वर्षं संतांनी साधलेलं हे मराठी माणसाचं ऐक्य, नव्या महाराष्ट्रानं आणखी दृढ केलं पाहिजे !''

३० एप्रिलला आम्ही पंडितजींना शब्द दिला :

''जर कधी हिमालयावर संकट आलंच, तर 'सह्याद्री' आपल्या काळ्या फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणासाठी उभी करील !''

त्या मध्यरात्री नव-महाराष्ट्राची पहिली पहाट उगवली -

(घन:श्याम सुंदरा - ही भूपाळी ऐकू येते)

संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न साकार झालं !

जीवघेण्या खिंडीतनं आम्ही पार पडलो. . . लोकांच्या अपेक्षांना आणि उत्साहाला उधाण आलं ! आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीचा 'सह्याद्री' एवढा प्रश्न माझ्यापुढं उभा होता. या पर्वतारोहणाला माझ्या मनाची तयारी होती.

पहिलाच प्रश्न होता :

'हे राज्य मराठा की मराठी ?'

महाराष्ट्राच्या इतिहासातून चालत आलेल्या ह्या परस्पर-अविश्वासाच्या गाठी होत्या. मला हे राज्य मराठ्यांचं करायचं नव्हतं, 'मराठी'चंच करायचं होतं ! . . . . ज्यांना धड लिहिता-वाचता येत नाही, बोलताही येत नाही, अशा सामान्यातल्या सामान्य मराठी माणसाला 'हे राज्य आपलं आहे' असं वाटेल, असं राज्य मला उभं करायचं होतं.

महार-वतनं नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३० वर्षांपूर्वी चळवळ केली . . . त्यासाठी माझ्या सरकारनं कायदा केला !

औरंगाबादला मी कलेक्टरांची 'मीटिंग' बोलावली. माझं भाषण संपल्यावर एक पोरसवदा कलेक्टर उठला. म्हणाला,

''साहेब, कशाला हा कायदा करता ? एक कोटी रुपये खर्च येईल

सरकारला - ''

''खाली बैस !'' मी ओरडलो, ''बस खाली ! गुलामगिरीच्या बेड्या तोडायचा खर्च मोजायला मला सांगतोस ? बस खाली !''

दलित बंधू नव-बौद्ध झाले; धर्म बदलला, तरी परिस्थिती बदलत नव्हती. घटनेनं दिलेल्या मागासवर्गीयांच्या सवलतींना ते मुकणार होते . . . नव्या सरकारनं त्या सवलती नव-बौध्दांनाही चालू ठेवल्या !

ब्राह्मण-ब्राह्मणेतर अविश्वासाचे वारे तर, पेशवाईपासून वहात होते. गांधीजींच्या हत्येनंतर त्यांचा स्फोट झाला. अनेक ब्राह्मणांची घरे जळाली. त्यांच्या पुनर्वसनाची सगळी कर्ज माझ्या सरकारनं माफ केली.

'ब्राह्मणांच भवितव्य' हे दिनकरराव जवळकरांचं भाषण मी अगदी लहानपणी ऐकलं होतं. 'देशाचे दुष्मन' हे त्यांचं पुस्तकही वाचलं होतं . . . त्या भाषणानं, त्या पुस्तकानं मी मनानं आणि विचारानं आमूलाग्र बदलून गेलो. जवळकरांनी टिळकांवर केलेली टीका बरोबर नव्हती. लोकमान्य टिळक हे इंग्रजांविरूध्द लढणारे एक महान सेनापती आहेत. अशा थोर माणसावर टीका करणारी ही माणसं इंग्रजांचे मित्र तर नसतील, अशी शंका माझ्या मनात येऊन गेली.

मराठी समाजात ब्राम्हण, मराठा, महार या जमातींचं महत्व मी जाणून होतो. नवा महाराष्ट्र उभारीत असताना, मला ही मनं सांधायची होती. भावनिक एकतेवरच नवा महाराष्ट्र उभा करायचा होता. मना-मनातला दुरावा दूर करायचा होता, सर्जनशीलतेला प्रोत्साहन द्यायचं होतं. महाराष्ट्राजवळ जे जे चांगलं आहे, जे जे उदात्त आहे त्याची जोपासना करायची होती. म्हणून आम्ही 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ची स्थापना केली. विश्वकोशाचा जगडव्याळ उपक्रम हाती घेतला.

साहित्य, कला, नाट्य, कुस्ती, तमाशा या क्षेत्रांना नवी पालवी फुटावी म्हणून आम्ही काही नवे उपक्रम हाती घेतले.

शिक्षण-प्रसाराच्या चळवळीला प्रचंड वेग दिला. 'सहकारी' कायदे करून शेतकऱ्याला सावकारी पाशातून मुक्त केले. अर्थ व्यवस्थेला ज्ञान-विज्ञानाची जोड देण्यासाठी, कृषी-औद्योगिक महाराष्ट्र उभा करण्यासाठी सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या काढल्या. शेती मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचं जाळं वाढवलं . . .

लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता !

स्वातंत्र्यानंतर 'स्व'राज्य, आणि नंतर 'सु'राज्याकडेच लोकशाही गेली पाहिजे . . . . पं. नेहरूंनी पंचायत राज्याचा उद्घोष केला, आम्ही इथं महाराष्ट्रात जिल्हा परिषदा स्थापन करून सामान्य कार्यकर्त्याला नेतृत्व-शिक्षणाची नवी प्रयोगशाळाच उघडून दिली.

हजारो तरूण कार्यकर्ते ,

कित्येक सहकारी संस्था,

पंचायत समित्या, जिल्हा परिषदा चालवू लागले.

शेकड्यांनी महाविद्यालयं निघाली.

अहो, चार कृषी-विद्यापीठं असलेलं महाराष्ट्र हे भारतातलं एकमेव राज्य आहे - एकमेव !

नव्या महाराष्ट्राची स्वप्न रंगवण्यात मी हा असा रात्रंदिवस बेहोष असतानाच, १९६२ च्या नोव्हेंबरात मला दिल्लीहून पं. नेहरूंचा फोन आला.

'आपको देहली आना है। as defence minister -मगर, किसीसे कहना नही'.

'' यह कैसा मुमकिन है ? I must consult at least one person -''

"who is that ?"

" My wife ! "

हे ऐकून पंडितजी दिलखुलास हसले. म्हणाले,

''मगर, यह बात बिलकूल --''

"I understand, I will keep it with me. I will come, that's certain !"

मुंबईत बसलेला जम सोडून दिल्लीला यायला वेणूबाई तशी नाराजच होती . . . मातोश्री विठाबाई वृध्द . . .

पंडितजींचा पुन्हा फोन आला :

''ताबडतोब या -''

गेलो. म्हटलं,

''पंडितजी, डिफेन्स प्रॉब्लेम्स की जानकारी के लिये मुझे कुछ समय चाहिये -''

''आप जल्दीही समझ जाएंगे - मुझे यकीन है, I want you in Delhi !

''मी उद्या पुन्हा आपली भेट घेतो.''

""Oh ! no,no, no - there is no going back now -''

मी दिल्लीत यायच्या आधीच चीननं ४० मैल आत मुसंडी मारलेली - *(तोफांचा गडगडाट ऐकू येतो)*

मी दिल्लीत पोचल्यापासून बिजू पटनाईकांनी माझ्या मागं धोशा लावलेला.

''परत जा ! मुंबईला परत जा !!''

१४ नोव्हेंबरला मी संरक्षण-मंत्री झाल्याची घोषणा झाली . . . २० तारखेला मी झोपेच्या आधीन होणार, तोच फोन खणखणला :

''साहेब, चीननं एकतर्फी युद्धसमाप्ती जाहीर केली आहे !''

('बीटींग द रिट्रीट' चा बिगुल)

तो पी.टी.आय. चा बातमीदार होता.

अशी ही युध्दसमाप्ती --

संरक्षण-मंत्र्याच्या जीवन-नाटकातला तो climax होता ! . . . संरक्षण-खातं माझ्याकडे आल्यापासून रोज सकाळी ९॥ वाजता मी तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांची बैठक घेऊन त्यांच्याशी चर्चा करायला सुरूवात केली. संरक्षणाच्या नेमक्या समस्या मला कळू लागल्या. माझ्या आधीचे संरक्षण-मंत्री व्ही. के. कृष्ण मेनन हे स्वत:च गटबाजीच्या आहारी गेलेले. .. त्यामुळे लष्करात परस्पर संशय, अविश्वास बोकाळलेला.

एक साधी गोष्ट घ्या - लढाईत गुंतलेल्या अधिकाऱ्यांसाठी जवानांसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या खात्रीनं ते काही करू शकले नाहीत. कारण काय ? तर म्हणे वित्तीय सल्लागाराचा निर्णय ! (तुच्छतेनं) ऊ: ! मी तो निर्णय बाजूला सारला, पंतप्रधानांशी चर्चा केली म्हटलं,

''त्यांच्याशी आपण प्रयत्न केले नाहीत तर दुसरं कोण करणार ?''

५००० कोटींची 'संरक्षण योजना' मी संसदेपुढे ठेवली . . .

'६३ साली नाशिक शहरानं मला लोकसभेवर बिनविरोध निवडून दिलं!

तेव्हा कवि कुसुमाग्रज म्हणाले,

''भूगोलात कृष्णा-गोदावरीचा संगम नाही, पण आज इतिहासात तो या निवडणूकीनं घडून आला आहे !''

६४ सालचा मे महिना .

मी अमेरिकेच्या दौऱ्यावर होतो. कोलोरॅडोमधली ती रात्र . . . मी गाढ झोपेत असताना मध्यरात्री २ वाजता फोन खणखणला :

"Nehru is no more !"

"Oh ! My God, I must rush back"

"Yes, yes - I understand, I have made all the arrangements"

फिलिप्स टालबोटच्या स्वरातला सहकंप जाणवला.

स्वतंत्र भारताचा भाग्यविधाता काळाच्या पडद्याआड गेला.

कोटी कोटी भारतीयांच्या गळ्यातला ताईत लाल जवाहर हरपला.

स्वातंत्र्य संग्रामातला सर्वात तेजस्वी तारा लोपला.

माझ्या डोळ्यापुढे काळाकुट्ट अंध:कार पसरला.

'नेहरूंच्या नंतर कोण ?' असा यक्षप्रश्न देशापुढे उभा होता . . . देश-विदेशात माझ्या अपरोक्ष माझ्या नावाची चर्चा चालू होती. ब्रिटिश पंतप्रधान मॅकमिलन, भारतात जयप्रकाश नारायण यांनीही माझं नाव घेतलं होतं.

पण

भारताच्या राजकारणात उत्तर प्रदेशाचं महत्व, तिथलं राजकारण मी जवळून पहात होतो; अलाहाबादचा वरचष्मा होता !

आणि माझ्यापुरतं सांगायचं, तर व्यक्तिगत महत्वाकांक्षेपेक्षा देशाचं स्थैर्य आणि पक्षाचं बळ वाढणं महत्वाचं होतं ! त्यामुळे, दिल्लीला राजकारणात मी पुष्कळसा सावध होतो.

लालबहादुर शास्त्री नवे पंतप्रधान झाले.

त्यांच्याबरोबर ताश्कंदला जायचा योग आला. करार झाल्यानंतरची मेज़वानी चालू होती. बॅण्डवर वाजत असलेल्या रशियन गाण्याचा अर्थ मी शेजारच्या मुत्सद्याला

विचारला, तर तो म्हणाला,

"वोल्गा नदीची थोरवी सांगणारं हे गाणं आहे."

मला माझ्या कराडच्या कृष्णामायची सय आली.

('संथ वाहते कृष्णामाई' हे गाणं ऐकू येतं)

परदेशात प्रवास करताना केव्हाही मला नदी लागली, आणि कृष्णामाईच्या आठवणीनं उर दाटून आला नाही, असं काही कधी झालं नाही . . .

कृष्णाकाठीच तर नाना फडणवीसांची कुशाग्र बुध्दि आणि धनाजी जाधवांची पराक्रमी तलवार तळपली होती ! नदीच्या काठीच तर मानवी संस्कृती स्थिरावली, बहरली . . . जीवन म्हणजे पाणी ! माणसाचं जीवन म्हणजे खळाळणारा जल-प्रवाह . . . कधी उतार, कधी वाकडी वळणं, तर कधी कड्यावरुन धबधब्यासारखं कोसळणं . . . *(क्षणमात्र स्तब्धता)*

त्याआधी घडलं ते असं :

चीनची वारी करुन पाकिस्तानच्या अयूबखानचे पॅटन रणगाडे १ सप्टेंबरला काश्मीरवर चालून आले. सूर्य अस्तास चालला होता. अंधार पडण्यापूर्वीच कृती करणं भाग होतं. पंतप्रधानांशी सल्लामसलत करायलाही वेळ नव्हता. सरसेनापती म्हणाले,

"हवाई हल्ला करायची हीच वेळ आहे ! या क्षणी निर्णय हवाय् -"

म्हटलं, "ठीक आहे ! द्या धडक !!"

मी बेधडक निर्णय दिला.

ह्या निर्णयामुळेच काश्मीर वाचला !

६ सप्टेंबरला भारतीय फौजा लाहोरच्या रोखानं निघाल्या आणि युध्दाचं सगळं रुपच पालटलं . . . रशियानं मध्यस्थी केली, युध्द समाप्त झालं -

पण, शास्त्रीजी गेले !

घनघोर युध्दात ते शत्रूवर विजय मिळवू शकले, पण काळावर विजय मिळवू शकले नाहीत. . .

('जय जवान, जय किसान' - घोषणा ऐकू येतात.)

पुन्हा देशासमोर तोच प्रश्न :

"आता कोण ?"

व्यक्तिपेक्षा देश आणि पक्ष महत्वाचा मानून मी इंदिराजींना पाठिंबा द्यायचा निर्णय घेतला. त्यामुळे माझे काही जवळचे मित्र

नाराज झाले; पण हिंदी-भाषिक राज्यातलं राजकारण त्यांना ठाऊक नव्हतं . . . मी ते जवळून पहात होतो !

श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या . . .

माझ्याकडे गृहमंत्रीपद आलं :

तीन अक्राळ-विक्राळ समस्या माझ्यासमोर राक्षसासारख्या उभ्या राहिल्या :

- पंजाबमध्ये संत फत्तेसिंगांचं स्वतंत्र पंजाबसाठी आमरण उपोषण;
- गोवध-बंदीसाठी संन्याशांचा मोर्चा; आणि
- विद्यार्थ्यांची उग्र निदर्शनं . . .

गृहमंत्र्यांचा एकच घास करायला, यातला एकेक प्रश्नदेखील पुरेसा होता; आणि इथं तर, तिन्ही बाजूंनी माझ्यावर मारा होत होता.

पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना मी फोनवरुन सांगितलं : ''संत फत्तेसिंगांना आधी उपोषण सोडायला सांगा - स्वतंत्र पंजाबचा विचार नंतर करु.''

दोन तासांनी टेलिप्रिंटरवर बातमी आली :

''संत फत्ते सिंगांचे उपोषण समाप्त !

स्वतंत्र पंजाब मिळणार -''

मी लगेच फोन लावून पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना विचारलं :

''मी मघाशी काय बोललो ते आपण नीट ऐकलं होतं ना ?''

(पंजाबी ढंगात) ''जी हाँ - मगर साहाब, मुझे पंजाब को बचाना था। अब, सन्त फत्तेसिंगजी की जान बची और पंजाब भी बच गया ! अब चाहे तो मुझे फाँसीपे चढ़ा दो - सिख्खों के पालिटिक्स में ऐसाही चलता है।''

पहिलं वर्षभर तसा इंदिराजींना 'कॉन्फिडन्स' नव्हता. 'गुंगी गुडिया' म्हणून लोहियांनी त्यांची कुचेष्टाच केली होती !

'६७ मध्ये अस्थैर्य वाढू लागलं . . .

पक्षातही मतभेदाचं पेव फुटलं . . .

'इण्डिकेट-सिण्डिकेट' दोन्ही गट टोकाला गेले; आणि अखेर - '६९ साली राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या खडकावर आदळून 'काँग्रेस-ऐक्या'चं जहाज दुभंगलं.

मी चिंतित झालो.

जे व्हायला नको होतं, ते होऊ लागलं . . . पक्षापेक्षा व्यक्तीचं स्तोम माजवण्याचं पर्व सुरु झालं . . . 'हाय-कमाण्ड'ला तडा गेला . . . पक्ष मोडतोय् याचं मला अपार दुःख होत होतं.

२६ जून '७० ला अर्थमंत्र्यांच्या खुर्चीवर बसायच्या आधी पाहून घेतलं :

''खुर्चीखाली एखादी तरफ नाही ना ?'' *(किंचित् खिन्न हसून)*

''कारण, मोरारजीभाई अर्थमंत्री-पदावरुन उडाले, तेव्हा आर. के. लक्ष्मणनं मोठं सुंदर 'कार्टून' काढलं होतं - शेजारच्या खोलीतनं इंदिराजी 'तरफ' खेचताहेत, आणि मोरारजीभाई अलगद खिडकीतनं बाहेर फेकले जात आहेत !''

म्हणून माझ्या खुर्चीखाली आधी बघून घेतलं :

तशी तरफ नव्हती !!! *(सौम्य हशा)*

१९७१ च्या 'बांगला-देश' युध्दात इंदिराजी दुर्गादेवीसारख्या तळपल्या, त्यामुळे '७२ च्या निवडणुका काँग्रेसनं तुफान जिंकल्या;

पण

कदाचित, हे अफाट यशच आम्हाला बाधक ठरलं असेल - पक्षापेक्षा व्यक्ती मोठी मानायची प्रवृत्ती काँग्रेसमध्ये आणखी वाढली :

'Indira is India'

म्हणण्यापर्यंत स्तुती-पाठकांची मजल गेली . . . तसा मलादेखील त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आदर होता. दिल्लीच्या एका प्रचार-सभेत मी म्हणालोसुध्दा :

''जर इंदिराजी हुकूमशहा असत्या, तर

१४ महिने शिल्लक असताना त्यांनी निवडणुका घेतल्या नसत्या . . . बँकांचं राष्ट्रीयीकरण, ऐदी संस्थानिकांचे तनखे रद्द करणं - ह्या आपल्या पुरोगामी धोरणांना लोकमताचा पाठिंबा आहे, हेच त्यांना देशाला दाखवून द्यायचं होतं !''

निवडणूक-निकालांनी त्यांचा आत्मविश्वास सार्थ ठरविला . . . अहो, महाराष्ट्रात तर ४४ पैकी ४३ काँग्रेसनं जिंकल्या !!

'७४ साली पुन्हा संरक्षण-खातं आणि त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये परराष्ट्र-

खात्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली.

मी परदेशात गेलो होतो, आणि *(दु:खानं उसासून)* इकडे - २६ जून '७५ला आणीबाणी घोषित झाली . . .

(खचून खुर्चीत खाली बसत)

तेव्हाच, 'सगळं सगळं संपलं -' असं 'फिलींग' मला आलं.

(थोडं सावरुन) '७७ च्या निवडणुकीत *(खर्जात)* ९ राज्यात काँग्रेस पराभूत झाली - ही पक्षाच्या इतिहासातली महा-भयानक घटना होती . . .

स्वत: इंदिराजी वर्षभर घरात बसून होत्या. *(उभारी धरुन)* अशा 'क्रायसिस'च्या काळात पक्षाची पुनर्बांधणी करण्यासाठी लोकसभेत विरोधी पक्ष-नेता म्हणून -

आणि *(ताडकन उठून)*

संसदेबाहेरही मी जोमानं कामाला लागलो !

पण *(पुन्हा खुर्चीवर बसत)*

फुटू पाहणारा पक्ष पुन्हा सांधला जायचा नव्हता . . . '७८ साली, उर्वरित काँग्रेस पक्ष पुन्हा फुटला, आणि काँग्रेस (आय्)चा जन्म झाला.

५ वर्षांसाठी लोकांनी निवडून दिलेलं 'मोरारजी सरकार' १॥। वर्षातच कोसळलं - तेही अंतर्गत दुफळीमुळेच -

(खिन्न हसून) आपल्या देशातल्या विरोधी पक्षांची एक मोठी गंमतच आहे. ते जिंकले, तर कुणामुळे जिंकलो, म्हणून भांडतात आणि फुटतात !

आणि

हरले, तर 'कुणामुळे हरलो ?' म्हणून भांडतात आणि फुटतात !! . . .

भांडण्यात आणि फुटण्यात मंडळी मोठी पटाईत आहेत . . . इथं अशानं द्विपक्षीय लोकशाही, रुजणार कधी ?

'मोरारजी-सरकार' विरुध्द अविश्वासाचा ठराव मी मांडला होता.

राष्ट्रपतींनी सरकार बनविण्यासाठी *(उठून)* मला पाचारण केलं होतं !

पण,

पुन्हा उत्तर-प्रदेशचं राजकारण आडवं आलं . . चरणसिंग पुढं झाले ! . . . माझ्या मनाविरुध्द काही जवळच्या मित्रांच्या आग्रहावरुन मी उप-पंतप्रधानपद

स्वीकारलं . . .

पण,

मला स्पष्ट दिसत होतं :

"हे काही खरं नाही, काऽही खरं नाहीए -"

- इंदिराजींची चाल;

- चरणसिंगांचा हेकटपणा;

तीन आठवड्यातच ते सरकार कोसळलं . . . माझा पुन्हा एकदा भ्रमनिरास झाला.

(हळूहळू काळोख होतो . . . शोकसंगीत वाजत रहातं . . . मग पुन्हा सावकाश प्रकाश उजळतो)

'८० सालच्या निवडणुकीत मी कराडहून निवडून आलो. शरद पवारांच्या दिण्डित सामील झाल्याबद्दल मला अटक झाली.

(खिन्न हसून) स्वातंत्र्य काळातली ती पहिली अटक होती . . .

ह्याच वेळी, महाराष्ट्रातून माझं नेतृत्व संपविण्याचा डाव खेळला गेला . . . ज्यांना मी मोठं केलं, तेच माझ्यावर उलटले. ज्यांची साथ मिळेल असं वाटलं होतं - त्यांचीही साथ मिळाली नाही . . .

याच सुमारास,

माझा मुलासारखा वाढवलेला पुतण्या राजा मोटार-अपघातात दगावला.

मनाच्या अशा खिन्न अवस्थेत मी काँग्रेस(आय्)मध्ये परत आलो. *(क्षणमात्र स्तब्धता)*

लहानपणी मी गावच्या 'सोनहिरा' ओढ्यात पोहण्यासाठी अंग झोकून दिलं . . . कृष्णा-कोयनेत पोहण्याचा अनुभव गाठीशी होता . . . पण, 'सोनहिऱ्या'च्या अरुंद पात्रात मात्र मी बुडू लागलो . . . दोघा-तिघांनी मला वाचवलं ! पण, बाहेर काढल्यावर ते कुचेष्टेनं म्हणाले,

"आमचा सोनहिरा कृष्णा-कोयनेपेक्षा जबरदस्त आहे !"

(उसासून) राजकारणाच्या मोठ्या, मुख्य प्रवाहात मी बराच काळ पोहू

शकलो; पण, छोट्या ओढ्यात पोहणाऱ्या छोट्या माणसांनी शेवटी माझ्यावर मात केली . . .

'८२ साली आठव्या वित्त आयोगाचं अध्यक्षपद माझ्याकडे आलं.

(झटकन् मूड बदलून)

(हसून) राजकारणात नको इतकं नाट्य असतं, आणि क्रीडा-नाट्य क्षेत्रातही नको तितकं राजकारण असतं ! नाट्य-कलेबद्दल लहानपणापासून प्रेम - म्हणून मी मुख्यमंत्री झाल्यावर महाराष्ट्र सरकारनं नाटकावरचा करमणूक-कर रद्द केला.

('प्रभू पदास -' ही नांदी ऐकू येते.)

दिल्लीच्या नाट्यसंमेलनात 'पंडितराज जगन्नाथ' हे नाटक पहायला यायचं पं. नेहरुंनी कबूल केलं होतं. पहिला अंक संपला आणि कुणी म्हणालं :

'पंडितजी काही येत नाहीत !'

तडक उठलो आणि त्यांच्या निवासस्थानी गेलो. नेहरु कार्यव्यग्र होतेच. तरीही त्यांना म्हणालो,

''आज तिथं दिल्ली प्रशासनातला एकूण एक मराठी अधिकारी जमलाय् -

Your presence for five minutes will convince them that there is no animus against Maharashtra in Delhi !''

animus म्हणजे आकस, पूर्वग्रह - हा शब्द चिंतामणराव देशमुखांनी '५३ साली राजीनामा देताना वापरला होता.

पाच मिनिटांसाठी आलेले पंडितजी पाऊण तास थांबले - दिल्लीच्या 'आयफॅक्स' नाट्यगृहात स्टेजवर बाजूच्या गल्लीतनं जावं लागतं; म्हणून आम्ही त्या दाराकडे पहात होतो; तर पंडितजी समोरुन उडी मारुन रंगमंचावर चढले !!

त्यांच्या आधी त्यांचा 'कमाण्डो' वर आला आणि लवंगिकेच्या मागे जाऊन उभा राहिला ! पंडितजी भडकलेच :

''पहले उसे वहाँ से हटाओ !''

त्यांनी प्रत्येक कलाकाराची ओळख करुन घेतली, सगळ्यांनाच आनंद झाला . . .

मी भाषेवर प्रेम करणारा माणूस आहे. साहित्यिकांना 'शब्दबंधू' मानतो! *(ठणकावून)* पण, संकुचित अर्थानं मात्र मी भाषेचा अभिमानी नाही. ज्ञानासाठी मातृभाषाच भली, एवढंच मला म्हणायचं आहे.

जीवन आणि समाज यांच्यातलं जिवंत नाट्य पकडणारी लोकाभिमुख कलाकृती हेच खरं नाट्य . . . रंगभूमीचे तीन मूलभूत घटक नाटककार, नट आणि प्रेक्षक - यातला एक जरी लंगडा पडला, तरी नाटक पडतं.

साहित्याविषयी मला अपार आस्था आहे. फावल्या वेळात मी आणि वेणूबाई जुन्या कवींबरोबरच नव्या, उमलत्या कवींचे संग्रह वाचीत असू. इचलकरंजीच्या साहित्य संमेलनात सुधाकर गायधनी या नव्या कवीच्या 'देवदूत' मधल्या चार ओळी मी महानोर यांना ऐकवल्या :

'अंगावर चिंध्या पांघरुन आम्ही सोनं विकायला बसलो,
तर गिऱ्हाईक फिरकता फिरकेना
सोनं अंगावर घेऊन आम्ही चिंध्या विकू लागलो,
तर गर्दी अजिबात आवरेना !'

कुसुमाग्रजांची 'गाभारा' ही कविता वाचून तर आम्ही दोघं अगदी हरखून गेलो :

'दर्शनाला आलात ? या -
पण, या देवालयात सध्या देव नाही
गाभारा आहे . . .
. . .
नाही, नाही - तसं नाही
एकदा होता तो तिथे -
. . .
पण, एके दिवशी, आमचं दुर्दैवं -
उत्तर दरवाजाजवळ आडवलेला कोणी एक भणंग

महारोगी

तारस्वरात ओरडला :
"बाप्पाजी बाहेर या !"
आणि काकड-आरतीला पहाटे आम्ही पहातो,
तो गाभारा रिकामा !
पोलिसात वर्दी आम्ही दिलीच आहे
परत ? कदाचित् येईलही -
पण महारोग्यांच्या वस्तीत राहिलेल्या त्याला
पुन्हा इथं प्रवेश द्यायचा की, नाही
याचा विचार करावा लागेल ट्रस्टींना !
. . .
तूर्त गाभाऱ्याचंच दर्शन घ्या -
तसं म्हटलं, तर अंतिम महत्व गाभाऱ्याचंच असतं
गाभारा सलामत तो देव पचास !"

- ('मुक्तायन', पाने ७९-८०)

इचलकरंजी साहित्य संमेलनात त्यांना व्यासपिठावर मंत्री नको होता, म्हणून मी समोर प्रेक्षकात बसलो . . . शारदेच्या मंदिरात जाताना अधिकार-पदाची पादत्राणं बाहेरच काढून ठेवलेली बरी !

मात्र, मी राजकारण कसं खेळावं, हे मला एक थोर, विनोदी लेखक-नट आणीबाणीच्या काळात शिकवायला लागले, तेव्हा मला त्यांना खडसावून सांगावं लागलं,

"राजकारणाचे धडे आम्हाला विदूषकांनी देऊ नयेत !"

कोणालाही उठसूट 'युगप्रवर्तक' म्हणणं मला काही पटत नाही. प्रा. ना. सी. फडके यांच्याविषयी संपूर्ण आदर बाळगूनही 'युगप्रवर्तक फडके' या कार्यक्रमात बोलताना मी स्पष्टच सांगितलं :

''युग हे व्यक्तीच्या मानानं फार लांब, फार मोठं असतं ! साहित्यिक कितीही थोर असला, तरी त्याच्या कर्तृत्वानं युगाला बांधून ठेवता येणार नाही.''

फडके म्हटलं की, अत्रे आठवणारच !

मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असताना अत्रे आमदार होते . . . चौपाटीवर मी एक झाड लावलं, त्या संदर्भात अत्रे विधानसभेत म्हणाले,

''यशवंतरावांनी लावलेल्या झाडाला कुत्रं पाणी घालताना आम्ही काल पाह्यलं !''

मी ताडकन् उठलो. त्या दिवशी कोणती कोणती कामं केली, ते सांगून म्हणालो :

''मी काल एवढी कामं केली, आणि अत्रे मात्र कोणत्या झाडाला कोणतं कुत्रं पाणी घालतंय्, ते पहात हिंडत होते !!'' *(मोठा हशा)*

'सीमेवरुन परत जा' हे नाटक लिहिणारे बाळ कोल्हटकर मला 'छोटा गडकरी' वाटले.

'गीत रामायणा'सारखं अक्षर-लेणं महाराष्ट्र-सरस्वतीला चढवणारे आधुनिक वाल्मिकी ग. दि. उर्फ अण्णा माडगूळकर यांना मी एकदा म्हणालो,

''अण्णा ! आता मोटार घेऊन टाका !''

तर ते म्हणाले,

''साहेब, आमच्या कुंडलीत वाहन-योग नाही.''

म्हटलं, ''नसू द्या हो ! वाहन घेऊन टाका आणि त्यात कुंडली द्या लटकावून !''

('पराधीन आहे जगती' या ओळी ऐकू येतात.)

उत्तम शब्दकळेवर माझं प्रेम आहे. एकदा आम्ही प्रवरानगरला बोलत बसलो होतो, तर बातमी आली :

"त्या अमक्या तमक्याला हृदयविकाराचा झटका आला -"

मी म्हटलं, "अरे, तो तर फार सुखी दिसत होता. शेती चांगली पिकत होती. प्रपंच व्यवस्थित आहे - मग हृदयविकाराचा झटका कसा ?"

यावर थोरले, पद्मश्री विखे-पाटील पटकन् म्हणाले, "साहेब ! त्याच्या काळजाला कुरुप झालं होतं."

वा : ! काय शब्द आहे - 'काळजाला कुरुप !'

अर्थमंत्री असताना शंतनुराव किर्लोस्करांशी आमची पैज लागली :

'निक्सन हरणार की जिंकणार ?'

म्हटलं, "काय हरता ?"

"एक रुपया !"

ते हरले, त्यांनी आठवणीनं एक रुपया पाठवून दिला.

मी अर्थमंत्री असतानाच ताई बस्तीकर - त्यांचा आणि नारायण पुराणिक यांचा वेरुळजवळ 'कैलास ट्रस्ट' होता - त्या दिल्लीला घरी आल्या. वेणूबाईला रागारागानं विचारु लागल्या :

"आमच्या 'ट्रस्ट'वर प्राप्ती-कर आकारणारा कोण गाढव अर्थमंत्री आहे हो ?"

मी पटकन् पुढे होऊन, हात जोडून त्यांना म्हटलं,

"ताई, तो सध्या तुमच्यासमोर उभा आहे !"

'५६-५७ साली पुण्याच्या हिराबागेत 'तमाशा-परिषद' भरली होती. 'केसरी'चे भा. द. खेर पण आले होते. मी त्यांना विचारलं :

"कसा काय वाटला तमाशा ?"

"सदाशिव-पेठी नाटकापेक्षा हा तमाशा फार सभ्य आहे !"

"अहो, माणूस सभ्य किंवा असभ्य असू शकतो ! साहित्य नव्हे." *(गंभीर होत)* बंदुकीच्या गोळीनं जे प्राप्त होत नाही, ते सामर्थ्य विचारातून, संस्कारातून येतं - आणि हे काम साहित्यामार्फत घडतं ! जनतेत सुप्त शक्ती आहेत. त्या जागृत करुन तिचं

सामर्थ्य वर्धिष्णू करायचं काम साहित्यानं केलं पाहिजे.''

'७४ साली एकसष्टीच्या निमित्तानं आळंदीला जायचा योग आला. जेव्हा जेव्हा मी आळंदीला गेलो, तेव्हा तेव्हा मी अजाण वृक्षाखाली १०-१० मिनिटं डोळे मिटून बसत असे. तेवढ्या वेळात राजकारणाचं ओझं कमी व्हायचं, तणाव सैल व्हायचे.

('समाधी साधन' - सुधीर फडक्यांचे स्वर ऐकू येतात)

आळंदीच्या भास्करराव साकतकरांना मी म्हटलं, ''ज्ञानेश्वर महाराजांवर आपण स्वतंत्र ओवीबध्द ग्रंथ लिहा -''

तर ते म्हणाले, ''द्रव्यबळ नाही !''

म्हटलं, ''श्री निवृत्ती विजय, श्री सोपानदेव हे ग्रंथ कागदावर छापलेत, पण ज्ञानेश्वर माऊलीचा ग्रंथ लोक सुवर्णपत्रावर छापतील !''

'किर्लोस्कर' मासिकात पिऱ्या मांगावर लेख लिहिणारे धों. म. मोहिते '५२ च्या निवडणूक-दौऱ्यात भेटायला आले; म्हणाले,

''तुमच्या या दौऱ्यात नेमकं आमचं गाव वगळलंय तुमच्या त्या टग्यांनी-''

त्यांचा 'टगे' हा शब्द मला खूप आवडला.

मी त्यांना आश्वासन दिलं :

''त्यांनी आखलेला दौरा सकाळी ९ वाजता सुरु होतो. मी ठीक ८ वाजता तुमच्या गावी हजर होतो ! मग तर 'टगे' आडवे येणार नाहीत ना ?''

असलाच एक परभृत, वडखळ-नाका-फेम टग्या म्हणाला, ''यशवंतराव म्हणजे महाराष्ट्रावरचा कलंक आहे.''

त्याच्या स्वच्छ चारित्र्याचा वर्षभरात पंचनामा सुरु झाला, त्याची लक्तरं पुढे १२ वर्षं वाऱ्यावर उडत होती . . .

काही टवाळखोरांना वाटतं : मी कुंपणावर बसणारा आहे - त्यांना मी एवढंच

सांगेन :

"जुन्यातलं चांगलं वेचायचं,

आणि नव्याच्या स्वागताला पुढं जायचं;

हीच आपली प्रवृत्ती असली पाहिजे !

अहो, दोन पिढ्यात अंतर आणि प्रसंगी संघर्ष येणारच !

पण, त्यातूनच तर प्रगती होते !!

१०० हून अधिक वर्षांची काँग्रेस आणि तिचं राजकारण, हेच देशाचं मूळ राजकारण, हीच निष्ठा मी वाऱ्या-वादळात जपली. सत्तेच्या राजकारणात कोण चढलं, कोण पडलं - ह्यापेक्षा देश पुढं गेला पाहिजे, पक्षाचं बळ वाढलं पाहिजे ह्या प्राणांतिक निष्ठेनंच मी काँग्रेसचा झेण्डा खांद्यावर घेऊन शेवटपर्यंत चालत राहिलो.

राजकारणाच्या धकाधकीत मला दिलासा देई ते संगीत ! हिराबाई, भीमसेन - नागपूरला भीमसेन जोशींची एक मैफिल चालू होती. काही श्रोते अस्ताव्यस्त पसरले होते . . . देशस्थ, वऱ्हाडी ! पंडितजींनी त्यांना समज दिली, तरी ते आपले लोळताहेत. मी ताडकन् उठून त्यांना खडसावलं :

'मैफिलीची म्हणून काही एक शिस्त असते ! तीही पाळता येत नसेल, तर घरी जाऊन लोळा !!'

'घरी या' असा आग्रह भीमसेन नेहमी करीत.

"तुमचा बंगला होऊ द्या मग येतो."

'८४ जून मध्ये कराडहून पुण्याला गेलो. भीमसेनजींची नवी वास्तू पाहून समाधान झालं !

त्यांच्या सौभाग्यवतींना म्हणालो,

"पंडितजींचं बाहेरचं सुरांचं वैभव अनेकदा पाह्यलंय, आज तुमचं घरचं वैभव पाहून आनंद झाला."

अर्थमंत्री असताना कराडच्या विश्रामगृहात फाटक्या लुगड्यातली एक म्हातारी मला भेटायला आली. पोलिस तिला येऊ देईनात. माझं लक्ष गेलं. लुगड्याच्या

घोळात लपवून तिनं काहीतरी आणलं होतं. मी तिला जवळ बोलावून विचारलं :

''म्हातारे, का आलीस?''

''समदा गाव येशवंताला नावाजतुया, तवा त्येला हा हार द्येवा - म्हून आलो.''

तोच हार मी तिच्या गळ्यात घातला,

आणि

तिच्या पाया पडलो.

अशीच आणखी एक म्हातारी आठवते. ६०-६५ च्या निवडणुकीचा काळ . . . सातारा मतदार संघात म्हसवडची सभा खूप रात्री लावली होती. थंडी मी म्हणत होती. एक म्हातारी स्टेजजवळ यायला धडपडत होती, कार्यकर्ते तिला अडवीत होते. मी म्हटलं,

''येऊ द्या तिला''

म्हातारी जवळ आली. चिरगुटात बांधलेली चटणीभाकर माझ्यापुढे धरीत म्हणाली,

''खाऊन घ्ये बाबा ! कवा जेवला असशीला ?''

तुम्हाला सांगतो, ती चटणीभाकर मी स्टेजवर खाल्ली. तिला अमृताची गोडी होती !!

ह्या अशा म्हाताऱ्यांमध्ये मी माझी '*आई*' पहात होतो.

३१ ऑक्टोबर '८४ ला इंदिराजींची निघृण हत्या झाली.

(बंदुकीचे तीन आवाज ऐकू येतात.)

अशा १८ गोळ्या ?

वैऱ्यालाही असं मरण येऊ नये !

त्यानंतरचे ७-८ दिवस मी सुन्न होतो. त्यांचे माझे मतभेद होते, पण आता मन मोकळं करावं असं दिल्लीत कोण उरलं होतं ?

माझा पी.ए. राम खांडेकर यानं विचारलं :

''साहेब, मुंबईला कधी जायचं ?''

''खांडेकर, खर सांगू ? आता मी दिल्लीत का राहतोय, तेच कळत नाहीए''

त्याच्या आधीच ,

जून १९८३ ला वेणूबाई मला सोडून गेली.

त्याच क्षणी,

माझ्या अंत:करणातल्या पवित्र नंदादीपाची ज्योत कायमची निमाली आणि हातात उरली ती फक्त चिमूटभर राख . . . . जीव कासावीस करणारी काजळी.

कराडला 'विरंगुळा' उभा राह्यला . . . .

मुंबई-महाराष्ट्रात मानानं २५-३० वर्ष काढली.

दिल्लीत २२ वर्ष झाली इतमामानं वावरलो . . . .

जग पाहून घेतलं . . . .

सत्ता, संपत्ती, मान-सन्मान काही काही कमी पडलं नाही ; खंत एकच होती: वात्सल्याचं इथलं, इथलं दालन रिकामंच राह्यलं . . . चिमुकल्या बाळकृष्णाच्या इवल्याश्या पावलांनी आमचे कपडे मळले नाहीत.

एक चिमुकला अंकुर डोकावून गेला,

पण,

कठोर दैवानं तो अवेळीच खुडून नेला !

(सुस्कारून) जगी सर्व सुखी असा कोण आहे ?

समर्थांच्या ह्या सवालाच्या आधारानंच,

आम्ही इतके दिवस एकमेकांचे डोळे पुशीत पुशीत बंगल्यावर साहित्यिक मैफिली भरवल्या,

काव्यवाचनाचे अनेक धुंद क्षण उपभोगले . . . .

पण,

आता माझे डोळे कोण पुसणार ?

कोण ?

(सावरून) शेवटी, जाता जाता मला नव्या पिढीला एकच सांगायचंय,

''धर्मानं तुम्ही कुणीही असा-कुणीही . . . .

हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन कुणीही !

आपला धर्म आपण आपल्या अंत:करणात, आपल्या घरात आणि आपल्या प्रार्थना मंदिरातच ठेवायला हवा.

राजकारणात आणि रस्त्यात आणू नये. भिन्न धर्म, भिन्न पोशाख, भिन्न भाषा यांनी नटलेला हा आपला प्राचीन संस्कृतीचा वारसा सांगणारा भारत म्हणजे

'विविधतेत एकता'

ह्या सत्याचं इंद्रधनुषी प्रतीक आहे !

इंद्रधनुष्यातला 'केशरी' कधी 'हिरव्या'शी भांडतो का ?

५००० वर्षांच्या सहिष्णुतेचा इतिहास असणारे हे राष्ट्र वर्धिष्णु होवो, जगाला शांतीचा संदेश देवो.

महाकवी इकबालनं म्हटल्याप्रमाणे :

'मजहब नहीं सिखाता
आपस में बैर रखना
हिंदी है हम
हिंदी है हम
हिंदी है हम
वतन है हिन्दोस्ताँ हमारा!!
सारे जहाँसे अच्छा, हिन्दोस्ताँ हमारा !!

(पडदा पडतो)

❑❑❑

सूचना : ह्या संहितेचा पूर्णत:/अंशत: वापर करून प्रयोग करू इच्छिणाऱ्यांनी प्रथम श्री. रंगनाथ कुलकर्णी, ३५ चिरंतन, शिवसृष्टी, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०००२४, फोन नं. ५५२ १७५८ ह्यांची लेखी परवानगी घेतली पाहिजे.

लोकमान्य टिळक

ग. प्र. प्रधान

लेखक : ग. प्र. प्रधान

साहित्य सृष्टीतील जादूगार

ना. सी. फडके

लेखक : अनिल बळेल

स्त्री-मुक्ती आंदोलन

विहंगमावलोकन

लेखिका : लैला महाजन

अक्षर वाङ्मय परिचय माला



चिमणराव किं. २० रु.

स्मृतिचित्रे किं. २५ रु.

बहिणाई किं. २० रु.

गर्भरेशमी शेला किं. ३५ रु.

ह्या चारही स्वस्त आणि दर्जेदार पुस्तकांसाठी लिहा :

रंगनाथ कुलकर्णी,

संपादक, सी/३५, चिरंतन, शिवसृष्टी, कुर्ला (पूर्व), मुंबई-२४. फोन : ५५२ १७

M9
CH